मूल्य ₹ २५/-

# हसती दुनिया
(मराठी)

अंक १२ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • डिसेंबर-२०२३



## जागतिक संगणक साक्षरता दिवस

# हसती दुनिया
(मराठी)

अंक १२ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ डिसेंबर-२०२३

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

मुख्य संपादक
डॉ. विजय शर्मा

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)


सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे • राजनंदन कृ. पिंपळकर
श्रीकांत द. पाटील • रोहित कि. खुडे

मुद्रक व प्रकाशक, राकेश मुटरेजा यांनी संत निरंकारी मंडळ, दिल्ली-९ करीता एच.टी. मीडिया लिमिटेड, प्लॉट नं.८, उद्योग विहार, ग्रेटर नोएडा-२०१३०६ (उ.प्र.) येथे छापून संत निरंकारी सत्संग भवन, संत निरंकारी कॉलनी, दिल्ली-११०००९ येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
E-mail : hduniya.marathi@nirankari.org
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९







## स्तंभ


- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- शब्दकोडे १४
- दिव्यवाणी २५
- हसा मुलांनो हसा ३०
- आरोग्याचा मंत्र ३६
- वाढदिवसाच्या शुभेच्छा ३७
- सामान्य ज्ञान ४७
- रंग भरा ५०


## चित्रकथा


- चित्रकथा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग



- दिनविशेष : हरि बुध्दा मागर ०६
- दिनविशेष : वीर बाल दिवस ०७
- संतकथा : संत एकनाथांची ..... १५
- दिनविशेष : भारतीय नौदल दिन २०
- व्यक्तीविशेष : रामानुजन श्रीनिवास २६
- भ्रमंती : पाटणादेवीचा कन्हेरगड २८
- प्रेरक प्रसंग : आपुलकीचा भाव ३५
- विशेष : सिनेजगत (चित्रपट) पुरस्कार ४२
- कुतुहल : पंख व केस कापताना... ४३
- विशेष : इस्रोचे अतुलनीय यश ४६
- विशेष : आनंदवनाचा यात्री ४८
- दिनविशेष : नाताळ ४९





## कथा


- दु:खाचं कारण ०५
- संस्कार ०८
- खरी तपश्चर्या २२
- परोपकाराची भावना २३
- स्वावलंबी बनावे ३२
- बुध्दांचा उपदेश ४४


## कविता


- ओळखा कोण?.... ०९
- चंद्रावर तिरंगा १२
- थंडी पडली ३४
- किसान दिन ४५






# शांती... अंतर्मनाची

स्वामी विवेकानंद विदेशात असताना त्यांनी अनेक ठिकाणी भाषणं दिली. त्यांच्या भाषणाने प्रभावित झालेल्या एका तरुणाने त्यांना आपल्या घरी आमंत्रित केलं. त्यांचा उत्तम प्रकारे आदर सत्कार केला. त्यांच्याशी चर्चा करत असताना त्याने स्वामीजींना एक प्रश्न विचारला, "स्वामीजी! भांडणाचं आणि अशांतीचं मूळ कारण काय?" स्वामीजी क्षणभर शांत राहिले. नंतर म्हणाले, "महोदय, मी तुमच्याकडे अतिथी म्हणून आलोय. तुमच्या वायपळ प्रश्नांची उत्तरं द्यायला मला वेळ नाहीये." हे ऐकताच इतका वेळ, प्रेम-नम्रतेने बोलणारा तो तरुण क्रोधित झाला आणि स्वामीजींना काहीबाही बोलू लागला. बराच वेळ आगपाखड केल्यानंतर तो शांत झाला. तेव्हा स्वामीजी स्मितहास्य करत म्हणाले, "मित्रा! मी तर तुला तुझ्या प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न करत होतो. जोपर्यंत मी तुझ्याशी प्रेमाने बोलत होतो, तोपर्यंत तूही माझ्याशी प्रेमाने बोलत होतास, माझ्याबद्दल तुला आदर असल्याचं सांगत होता; परंतु मी एकच शब्द उध्दटपणाने बोललो; पण तेवढाही तुला सहन झाला नाही. कुठे गेलं ते प्रेम? कुठं गेली तुझी विनम्रता?... जोपर्यंत तुझ्या हृदयात, अंतर्मनात प्रेम, नम्रता, सहनशीलता, शांती वसत नाही तोपर्यंत वरवरचं प्रेम, वरवरची नम्रता, शांती काही कामाची नाही. वास्तविक मनुष्याचा मूळ स्वभाव हा शांतस्वरुप आणि आनंदरुप आहे. आपल्या मूळ स्वभावाची ओळख झाल्याशिवाय जीवनात शांती आणि समाधान येणार नाही. ज्याच्या हृदयात मानवमात्राविषयी करुणा असते, दया असते, शांती असते, प्रेम असतं, तोच जगाला शांती प्रदान करु शकतो." म्हणूनच शांतीदूत बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी म्हटलंय - शांती या सहस्त्रकाची गरज आहे आणि ती फक्त ब्रह्मज्ञानानेच प्राप्त होऊ शकते. यालाच स्वत:ची ओळख करुन घेणं असं म्हटलेलं आहे.

आता संपत आलेल्या वर्षाचा निरोप घेताना मागील चुका टाळू या. चुकलेल्यांना क्षमा करत आणि आपल्या हातून घडलेल्या चुकांबद्दल क्षमा मागत आपल्या मूळ स्वभावात असलेल्या दैवी गुणांचे अलंकार परिधान करु या. दया, क्षमा, प्रेम, नम्रता, सहनशीलता इ. सद्‌गुणांनी सालंकृत होऊन नववर्षाच्या स्वागतासाठी सज्ज होऊ या.

- राजेंद्र थोरात
hduniya.marathi@nirankari.org

# दुःखाचं कारण



एकदा नारद मुनींना अहंकार झाला होता, की आपण इच्छा-कामना यावर विजय मिळवलेला आहे. भगवान श्री विष्णूंच्या हे लक्षात आलं. भगवंताला अहंकार कधीच आवडत नाही. भक्ताचा अहंकार दूर करण्यासाठी भगवंत काही ना काही लीला करत असतात. कधी कधी भक्ताच्या हितासाठी काही करताना खुद्द भगवंतालाही कर्मभोग भोगावे लागतात.

नारद मुनींचा अहंकार दूर करण्यासाठी भगवंतांनी माया रचली. माता लक्ष्मीचा विवाह स्वयंवर रचला. अनेक दिग्गज राजे महाराजे तिथं उपस्थित झाले. भगवान विष्णूही नारदमुनींसह तेथे पोचले. माता लक्ष्मीचं अप्रतिम सौंदर्य पाहून नारदांच्या मनात तिच्याशी विवाह करण्याची इच्छा जागृत झाली. या सौंदर्यवतीने आपल्या गळ्यात वरमाला घालावी, असं त्यांनी अनेकदा बोलूनही दाखवलं. तेव्हा भगवान विष्णू म्हणाले, "नारदा! तुझं तोंड पाहिलंस का?" माता लक्ष्मी प्रत्येकासमोर येऊन उभे राहत शेवटी भगवान विष्णूंच्या समोर आली आणि तिने भगवान विष्णूंना वरमाला घातली. तेव्हा नारदाने पाहिलं, की भगवंताने आपलं तोंड माकडासारखं करुन ठेवलं. याचा त्यांना राग आला आणि त्यांनी भगवान श्रीविष्णूंना शाप दिला, की ज्या सौंदर्यवतीसाठी मी व्याकूळ झालो, तसे तुम्ही देखील तुमच्या प्रिय पत्नीसाठी व्याकूळ व्हाल आणि शेवटी तुम्हाला माकडाचीच मदत घ्यावी लागेल.

वास्तविक भगवंतांनी भक्ताचा अहंकार दूर करण्यासाठी ही लीला रचली; परंतु कुठेतरी कर्माचं बीज रोवलं गेलं आणि ते कर्मफळ त्यांना राम अवतारामध्ये भोगून पूर्ण करावं लागलं.

स्वयं परमात्मा जेव्हा अवतार घेतो तेव्हा त्याला अनेक कार्ये पूर्ण करायची असतात. जय-विजय हे भगवान विष्णूंचे द्वारपाल होते. त्यांना दिलेला शाप तोही पूर्ण करायचा होता. कारण जय-विजय हेच कुंभकर्ण आणि रावण म्हणून जन्माला आले होते. त्यानंतर माता शबरीला नवविधा भक्ती प्रदान करायची होती. अनेक राक्षसांचा संहार करुन सज्जनांचं रक्षण करायचं होतं. अशी कार्य करण्यासाठी त्यांनाही अनेक दु:ख भोगावी लागतात.

अनेकदा आपल्या जीवनात काही दु:ख-संकटं आली, की आपण म्हणतो अमक्यामुळे हे सारं घडलं; इतरांना दोष देण्याऐवजी आपण आपल्या कर्मफळाचा विचार केला पाहिजे.

तात्पर्य : आपल्या सुखदु:खाचं कारण आपण स्वत:च असतो. ❖



# हरी बुध्दा मागर

## एव्हरेस्ट शिखर सर करणारे पहिले दिव्यांग गिर्यारोहक

दोन्ही पाय नसूनही कृत्रिम पायाच्या साह्याने ८८४८ मीटर उंच एव्हरेस्ट शिखर सर करणारा पहिला दिव्यांग गिर्यारोहक म्हणजे हरी बुध्दा मागर!

हरी बुध्दा मागर हे ब्रिटिश लष्करातील निवृत्त गोरखा जवान असून सध्या ब्रिटनमधील कॅन्टरबरी शहरात वास्तव्यास आहेत. त्यांचा जन्म पश्चिम नेपाळमधील रोल्पा जिल्ह्यात मिरुल या गावी १९७९ मध्ये झाला. बालपणापासूनच ते खडतर आयुष्य जगले. दररोज हिमालयातील डोंगरदऱ्या ओलांडत एक तास पायपीट करुन शाळेत जात. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर १९ व्या वर्षी रॉयल गोरखा रायफलच्या माध्यमातून त्यांनी ब्रिटिश सैन्यात नोकरी मिळवली.

२०१० मध्ये अफगाणिस्तानात तैनात असताना त्यांचा पाय भूसुरुंगावर पडला आणि स्फोटात त्यांनी आपले दोन्ही पाय गमावले. स्फोटानंतर शुध्दीत आल्यावर त्यांना आपलं आयुष्य संपलं असं वाटू लागलं; परंतु हळूहळू त्यांनी स्वतःला सावरलं. स्कीइंग, गोल्फ, सायकलींग आणि गिर्यारोहण यामुळे हरवलेला विश्वास वाढवला. लोकांचा दिव्यांगांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी काहीतरी वेगळं करुन दाखवण्याचा निश्चय त्यांनी केला. त्यातूनच जगातील सर्वात उंच एव्हरेस्ट शिखर सर करण्याचं आव्हान स्वीकारलं.

२०१७ मध्ये नेपाळ सरकारने दिव्यांग व्यक्तींच्या गिर्यारोहणावर बंदी आणली होती; परंतु मागर यांनी स्वयंसेवी संघटना आणि मानवतावादी विचारवंतांच्या साह्याने या बंदीला विरोध केला. शेवटी सर्वोच्च न्यायालयाने २०१८ मध्ये ही बंदी उठवली. आणि मागर यांचा मार्ग मोकळा झाला.

मे २०२३ च्या पहिल्या आठवड्यात कृप थापा यांच्या नेतृत्वातील टीम सोबत मागर यांनी एव्हरेस्टची चढाई सुरु केली. ११ दिवसांच्या खडतर प्रवासानंतर १९ मे २०२३ रोजी रात्री साडेआठ वाजता एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत करत या ४४ वर्षीय अवलियाने इतिहास घडवला. दोन्ही पाय नसतानाही जगातील सर्वोच्च शिखर सर करणारे मागर हे पहिले गिर्यारोहक ठरले.

याबाबत मागर म्हणतात, लोकांची दिव्यांगाबद्दलची धारणा बदलून इतरांना प्रेरणा देणे हे माझं ध्येय होतं.

प्रबळ इच्छाशक्ती असेल तर आपण काहीही साध्य करु शकतो, हेच खरं!



दिन विशेष

# वीर बाल दिवस

काय आहे या दिवसाचं महत्त्व? जाणून घ्यायचं आहे?... हा दिवस फक्त बालकांसाठी आहे असं नव्हे तर तुमच्या - माझ्यासाठी सुध्दा आहे! या बलिदानाचे कथन ऐकले किंवा वाचले तरी अंगावर काटा येतो आणि नकळतपणे कृतज्ञतेने हात जोडले जातात...

गुरु गोविंदसिंहजी यांचे दोन लहान पुत्र होते. फतेहसिंग वय सहा वर्षे आणि जोरावरसिंग..... वय ८ वर्षे. मुघल सत्तेचा जाच प्रचंड वाढला होता. धर्म परिवर्तनासाठी हिंदूंचा छळ केला जात होता. नबाब वजीरखान याने या बालकांना धमकावले,"इस्लाम धर्म स्वीकारा अन्यथा मरणाला तयार राहा." फतेहसिंहाने तेवढ्याच बाणेदारपणे विचारले, "इस्लाम धर्म स्वीकारला तर मरण येणार नाही का?... आणि मरण येणारच असेल तर आपल्याच धर्मात राहून धर्मासाठी बलिदान करत मरण पत्करु..." काय बाणेदारपणा होता या बालकांचा! निर्दयी नबाबाने दोन्ही कोवळ्या, निष्पाप गुरुपुत्रांना भिंतीत चिणून मारण्याचाआदेश दिला. त्यावेळचा प्रसंग तर विदारक होता. फतेहसिंहच्या मानेपर्यंत विटा बांधून झाल्या, त्यावेळी जोरावरसिंह रडायला लागले. कारण काय, तर... फतेहसिंह! तू माझ्यापेक्षा लहान आहेस. या जगात माझ्या नंतर आलास; पण माझ्या आधीच चाललास म्हणून! ही घटना आहे दि. २६ डिसेंबरची.

खरं म्हणजे केवळ २६ डिसेंबरचेच हे बलिदान नव्हे तर दि. २१ ते २७ डिसेंबर या कालावधीत गुरु गोविंदसिहजींच्या सर्व परिवाराने धर्मासाठी बलिदान केले आहे.

शीख पंथ हा हिंदूचे सुरक्षा कवच म्हणून मानला जातो. गुरु तेगबहादूर यांनी काश्मिरी पंडितांवर होणाऱ्या अत्याचार आणि धर्मांतर सक्तीविरुध्द बादशहाला विरोध केला म्हणून त्यांना अत्यंत क्रूर आणि पाशवी अत्याचाराला बळी पडावे लागले. त्यांचे मस्तक उडवण्यात आले.

त्याच तेगबहादूर यांचे पराक्रमी पुत्र दहावे गुरु गुरु गोविंदसिंहजी यांनी देश आणि धर्मरक्षणासाठी पूर्ण समाजाला एकत्र केले. पंजाबमध्ये घरटी किमान एक जण शीख होणे हा प्रघातच झाला होता.

फतेहसिंग आणि जोरावरसिंग यांच्या अतुलनीय बलिदानाच्या दुसऱ्याच दिवशी माता गुजरीजी यांनीही आपले प्राण त्यागले.

अन्य पुत्र अजितसिंह आणि झुंझारसिंह यांचेही याच काळात बलिदान झाले. गुरुजींना बादशहाने खोटी आश्वासने देऊन त्यांना किल्ल्यातून बाहेर यायला लावले आणि त्यांच्यावर भ्याडपणे हल्ला केला... त्यातच त्यांचेही बलिदान झाले.

त्यांचा जाज्वल्य, पराक्रमी आणि स्फूर्तिदायी इतिहास आपल्या स्मरणात असावा.

धर्म आणि राष्ट्र रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या गुरुंच्या सर्व परिवारास मानाचा मुजरा... ❖



कथा

# संस्कार

प्रल्हादराव आणि प्रियाताई यांची एकुलती एक मुलगी सानिका, खूप लाडात वाढलेली होती. ती आता हळूहळू मोठी होऊ लागली. सानिका सातव्या इयत्तेत असतानाच कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता. त्यामुळे शाळाही बंद झाल्या. नंतर सुरु झाल्या तर त्याही मोबाईलच्या माध्यमातून, वर्चुअल. इच्छा नसतानाही पालकांनी शिक्षणाचे साधन म्हणून मुलांना मोबाईल घेऊन दिले. मुलांनी या आधुनिक यंत्राच्या माध्यमातून आपले शिक्षण या खडतर काळातही सुरु ठेवले.

आता कोरोनाचा प्रादुर्भाव जरी ओसरला असला तरी मुलांची मोबाईलशी असलेली जवळीक काही कमी झाली नव्हती. सानिकाही त्याला अपवाद नव्हती. तीही शाळेतून आल्यावर तासन्‌तास मोबाईल घेऊन बसत असे, सोशल मिडिया, यू ट्यूब याचे जणू तिला व्यसनच लागले होते.

इकडे प्रल्हादरावांना मात्र आपल्या लेकीच्या भविष्याची काळजी वाटू लागली. कारण आज न उद्या ती लग्न होऊन सासरी जाईल, तेव्हा तिच्या जीवनात कोणत्याही अडचणी येऊ नयेत एवढीच

त्यांची इच्छा होती. ते आपल्या मुलीकडे सतत लक्ष ठेवून होते, ती आईला घरकामात मदत करते, की नाही. घरातल्या लहान सहान जबाबदाऱ्या पार पाडते की नाही.

एकदा सानिकाची आई स्वयंपाक करत होती; पण सानिका मात्र फोनवर मैत्रिणीशी गप्पा मारत बसली होती. दुसऱ्या दिवशी आई घराची साफसफाई करत होती आणि सानिका मात्र निवांत टीव्ही बघत बसली होती.

प्रल्हादरावांनी तिला प्रेमाने जवळ घेत म्हटले, "बेटा सानिका, मला एक सांग, एखादी मुलगी स्वत:च्या आईचा विचार करत नसेल, आईला घरकामामध्ये मदत करत नसेल, तर ती मुलगी दुसऱ्याच्या आईसोबत कसा व्यवहार करेल, काय वाटतं तुला ?" त्यावर सानिका चटकन म्हणाली, "बाबा, अशी मुलगी घरकामात मदत करणं तर सोडाच; पण दुसऱ्याच्या आईच्या भावना सुध्दा समजू शकणार नाही." त्यावर प्रल्हादराव पुढे म्हणाले, "बाळा, आपली होणारी सून केवळ एक शोभेची बाहुली म्हणून कोणाला आवडेल का ? नाही ना! आपली सून संस्कारी असावी, सर्वांची मनापासून काळजी घेणारी असावी असंच प्रत्येकाला वाटेल, बरोबर आहे ना ?"

सानिकाने मान हलवत हो म्हटलं. तिच्या पटकन लक्षात आले, की बाबांना नक्की काय म्हणायचे आहे. ती बाबांना वचन देत म्हणाली, "बाबा, आजपासून मी आईला घरकामात मदत करेन. आईच्या तब्येतीची काळजीही घेईन. बाजारात जाऊन भाजीपाला, किराणा घेऊन येईन. मोबाईलचा उपयोगही आवश्यक तेवढाच करेन."

हे ऐकून प्रल्हादरावांना खूप आनंद झाला. खूश होत त्यांनी तिला खूप खूप आशीर्वाद दिले. ❖





# ओळखा कोण?...

तपकिरी पंख माझे, पांढरे पोट
डोके अन् गळा, छाती काळपट

लाल लाल चोच, पाय लांबट
पायांचा रंग, आहे पिवळट

माळरानावरी, शेत-शिवारी
राहत असते मी नदीकिनारी

पायांना माझ्या, बोटे तीन
फांदीवरील पकड, आहे क्षीण

बसता येत नाही, झाडावर
तरुतुरु धावते, जमिनीवर

किडे अन् धान्य, टिपून खाते
सदैव मात्र, सावध असते

टीटीवटीव आवाज, करते छान
ओळखा पाहू, आहे मी कोण ?

- प्रा. देवबा पाटील





विचारपुष्प

# ज्ञानप्रकाशात चालत राहावे

फक्त चालत राहणं म्हणजे पोहचणं होत नाही. योग्य दिशाही असली पाहिजे. त्यासाठी योग्य दिशा ठरवणं गरजेचं असतं. आपल्याला कोणतं ध्येय साध्य करायचं आहे हे लक्षात आलं, की त्या दृष्टीने कोणत्या गोष्टी ग्रहण करायच्या आणि कोणत्या सोडून द्यायच्या याची जाण येते. दैनंदिन जीवनात अनेक व्यक्ती, घटना, प्रसंग आपण पाहत असतो. कानाने, डोळ्याने

अनेक गोष्टी आपल्या मनात प्रवेश करत असतात. त्या सगळ्याच गोष्टी स्वीकारत गेलं तर मन दूषित होईल. सदैव बेचैन आणि अस्वस्थ राहील म्हणूनच ब्रह्मज्ञानाच्या माध्यमातून त्या गोष्टी, ते विचार फिल्टर (गाळून) करुन घ्याव्यात. आत्म-कल्याणाच्या ज्या ज्या गोष्टी आहेत तेवढ्या ग्रहण कराव्यात. जर काही चुकीच्या बाबी आढळून आल्या तरी त्यातून जे चांगलं आहे तेच शोधून काढावं. जीवनात आपण जर निराकार-प्रभू-परमात्म्याला प्राधान्य देत आहोत, तर दुनियावी बाबी गौण ठरतात. म्हणून हे ध्येय पुढे असलं पाहिजे. अन्यथा घाण्याला जुंपलेल्या बैलासारखं केवळ चालत राहणं होईल.

एक वाटसरु रस्त्याने जात होता. त्याला सरळ रस्त्याने पुढे जायचं होतं; परंतु अंधार पडू लागला होता. त्यामुळे रस्ता सरळ असूनही तो पुढे जायला धजावत नव्हता. कदाचित मध्येच काही अडथळे उभे राहिले किंवा काही अघटीत घडलं तर?..... असा विचार करत तो उभा होता. एका सद्‌गृहस्थाने त्याच्या मनाची अवस्था जाणून त्याला एक कंदिल देत सांगितले, की जर तुम्हाला तुमचा मार्ग ठाऊक आहे तर या कंदिलाच्या उजेडात थोडा थोडा रस्ता पार करत जा. जसजसे तुम्ही पुढे जाल तसतसा पुढचा मार्ग दिसत जाईल आणि तुमचा प्रवासही लवकर पूर्ण होईल.

आपणही या ज्ञानप्रकाशात वाटचाल करण्याचा सराव केला पाहिजे. प्रभू-परमात्म्याच्या जाणिवेत राहिल्याने जीवनात सकारात्मकता येईल. सेवा, सत्संग, नामस्मरणात मन रमेल आणि जीवन सुसह्य होईल. कारण आपण पाहतो, की जेव्हा एखाद्या विचारांची मालिका मनामध्ये सुरु होते तेव्हा त्याला अनुसरुन कितीतरी विचार अखंड चालूच राहतात. तसं आपल्या मनामध्ये जर सकारात्मक विचारांची मालिका सुरु झाली, तर मन प्रसन्न होत जातं. प्रसन्नता हा तर आत्म्याचा गुणच आहे. म्हणून आपल्या मूळ स्वभावाशी नेहमी जोडून राहिलो, तरच जीवनाचं जे ध्येय आहे, मोक्ष मुक्ती ते प्राप्त होणार आहे. कारण आपण या ईश्वरामधून आलो आहोत आणि अंती या ईश्वरामध्येच विलीन व्हायचं आहे. म्हणून याचा अभ्यास आतापासूनच केला पाहिजे. नंतर करु किंवा म्हातारपणी करु असं जर म्हटलं तर मनाला सांसारिक गोष्टींच्या चिंतनाची जी सवय लागलेली आहे, ती तर लगेच जाणार नाही.

जशी दृष्टी तशी सृष्टी या उक्तीप्रमाणे ज्या गोष्टींच्या चिंतनाची आपल्याला मनाला सवय लागते, तेच सर्वत्र दिसू लागतं. म्हणून देहात प्राण असतानाच आपण या गोष्टींचा सराव ठेवला पाहिजे. ❖

## क्षमस्व!

नोव्हेंबर २०२३ हसती दुनिया (मराठी पृ.क्र.३३) वर ताजमहाल १९३२ मध्ये बांधायला सुरुवात केली व १९५४ मध्ये बांधकाम पूर्ण झाले असे लिहिले आहे. वास्तविक हे बांधकाम १६३२ला सुरुवात होऊन १६५४ ला संपले असे असायला हवे.

चुकीबद्दल दिलगीर आहोत.
सूज्ञ वाचकांचे आभार!



# चंद्रावर तिरंगा

इस्त्रोच्या शास्त्राज्ञांचं नाव सर्वांच्याच ओठावर
भारताचं चंद्रयान - ३ जाऊन पोचलं चंद्रावर
कोटी कोटी जनतेचा विश्वास सार्थ ठरवला
दक्षिण ध्रुवावर प्रथमच भारताने झेंडा रोवला
दक्षिण ध्रुव गाठण्यासाठी केली अनेकांनी शिकस्त
पण तिथं मात्र सर्वांचीच झाली पुरती फसगत
विक्रम बग्गी उतरली चांदोमामाच्या घरी
प्रज्ञान रोबोट फिरता ऐटीत दक्षिण ध्रुवावरी
चंद्रावर उमटवल्या इस्त्रोने पाऊल खुणा
विश्वविजयी भारताच्या अस्तित्वाच्या जाणा
दडलेली गुपिते सारी सुंदर, सखोल, आसमानी,
कळतील नित्य आम्हा होऊन चित्र कहाणी
भव्य तिरंगा आमुचा, शोभतो चंद्रावरती,
साऱ्या जगाच्या नजरा पहा कशा विस्फारती!

- आदित्य पारखे
(विक्रोळी, मुंबई)

# दादाला विचारु या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्‌गुरु बाबाजींचे

**प्रश्न : सर्व प्रकारची उपलब्धता असूनही माणूस पूर्णपणे सुखी असल्याचे दिसत नाही, असे का?**

**उत्तर :** सुखे दोन प्रकारची असतात. एक लौकिक, दुसरे अलौकिक. लौकिक सुखाचा अनुभव इंद्रियांद्वारे होत असतो. उदा. शब्द, स्पर्श, रुप, गंध आणि चव. पाच ज्ञानेंद्रियांनी ही सुखे प्राप्त होतात. सुंदर गीतं श्रवण करणे हा कानाचा विषय. सुखद स्पर्श हा त्वचेचा, सुंदर रंगरुप हा डोळ्यांचा विषय, विविध प्रकारचे सुगंध हा नाकाचा विषय, तर स्वादिष्ट पदार्थांचे सवेन हा जिभेचा विषय आहे. यातून सुखाची अनुभूती येते यात शंकाच नाही. परंतु इंद्रिये जशी नाशिवंत तशी ही सुखे देखील नाशवान आहेत. शिवाय देहाला व्याधी होतात त्यामुळे जी सुखं आज हवीहवीशी वाटतात ती पुढे देहासाठी त्रासदायक ठरु शकतात. उदा. थंडगार हवा, थंड पाणी सुख देते; पण संधीवाताचा विकार, सर्दी-कफ या व्याधीत तीच गोष्ट दुःखदायक ठरते. ही सुखं चिरकाल सुख देणारी ठरत नाहीत. त्यामुळे सर्व प्रकारची उपलब्धता असूनही मनुष्य पूर्णपणे सुखी दिसत नाही.


**प्रश्न : मग खरे सुख किंवा आनंद कशात आहे?**

**उत्तर :** इंद्रियांद्वारे मिळणारे सुख हे देखील सुख आहेच; पण ते क्षणभंगुर असते. त्यामुळे ते पुनः पुन्हा हवे-हवेसे वाटते. त्या सुखाने मनाची पूर्ण तृप्ती होत नाही. तृप्ती झाल्याचा भास होतो; पण भूक मात्र वाढत जाते. ज्याप्रमाणे उपाशी माणसाला भोजनाचा खमंग वास क्षणभर आनंद देतो, तसे इंद्रियजन्य सुखे सुखाचा आभास निर्माण करतात. मुळात इंद्रिये आणि त्यांना सुखाचा भास देणारी साधने दोन्हीही नाशिवंत असल्याने सुखाचा आभास कमी जास्त होतो, तो खरा आनंद नाहीच. मृगजळातील पाणी पिऊन कोणीच तृप्त होत नाही. म्हणून इंद्रियांपासून आनंदाची अपेक्षा करणे चूक ठरते. खरा आनंद हा आत्मिक आनंद आहे. आत्मा हा सर्व आनंदाचं स्त्रोत आहे. आत्मस्वरुपाशी एकरुप होण्याचा अभ्यास करावा. दिवसातून काही काळ या निराकार पारब्रह्म परमात्म्याशी जोडून राहता आले पाहिजे. सातत्याने स्मरण, आठवण, निदिध्यास यातूनच आत्म्याचा आनंद मनाला पुलकित करतो. यालाच जाणिवेत राहणे किंवा अनुभूतित राहणे असे म्हणतात.

# शब्दकोडे

# २२५

○ विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)



## आडवे शब्द

१. भारतीय वंशाची दुसरी महिला अंतराळ वीरांगणा ...... विल्यम

३. न जुळणारा शब्द : पिवळा, हिरवा, कळवा, नारिंगी

५. श्रीगणेशाचे एक नाव

७. बोलाचा ..... बोलाची कढी (म्हण)

८. मावशीचा पती

९. सुंठीवाचून ....... गेला (म्हण)

११. हिमोग्लोबीन वाढवण्यासाठी खावयाचे एक कंदमूळ

१३. बाबा गुरबचन सिंहजी यांचा जन्म .... डिसेंबर, १९३रोजी झाला

१४. 'विदेही' असे राजा .... यास म्हटले आहे

१५. अमेरिकेचे चलन

## उभे शब्द

१. खालीलपैकी कोणते पात्र महाभारतातील नाही : नकुल, सुग्रीव, संजय, अर्जुन

२. भारत-पाकिस्तान युध्दानंतर लाल बहादूर शास्त्रीजींनी .... करार घडवून आणला

३. पहिली भारतीय अंतराळ वीरांगना

४. पंढरपूरच्या वारीला नित्यनेमाने जाणारे भक्तगण

६. २५ वी जयंती म्हणजे ..... जयंती

७. 'यमद्वितीया' असे कोणत्या सणाला म्हणतात?

८. वानर याचा समानार्थी शब्द

१०. या राज्याची राजधानी पाटणा आहे

१२. एक हजार किलोग्रॅम बरोबर एक ....

१३. सैनिकांचा समूह

उत्तरे इतरत्र

संतकथा

# संत एकनाथांची क्षमाशीलता

एकेकाळी शालिवाहनांची राजधानी असलेल्या प्रतिष्ठान-नगरीत अलीकडे चोरीचं प्रमाण वाढत चाललं होतं. धनिकांच्या घरी तर अधून-मधून चोरी व्हायचीच. मग ती बातमी पसरली, की इतरांची झोप उडायची. तिजोऱ्यांजवळील गस्त वाढायची. नाथवाड्यात मात्र सगळी मंडळी शांत झोपायची.

एका रात्री मात्र चोरांनी नाथवाड्याकडे आपला मोर्चा वळवला. कीर्तनात लोक रंगलेले असताना डाव साधावा असं ठरवून चोर दबा धरुन बसले; परंतु त्यावेळी चोरी साधली नाही. म्हणून मध्यरात्री सर्वांना झोपा लागल्यावर हळूच आपला हेतू साधण्याचा प्रयत्न त्यांनी सुरु केला. एकाचा पाय देवघराजवळून पलीकडच्या खोलीत जाताना घसरला. तिथल्या चंदनी पाटाला पाय लागून तो खाली पडला. त्या आवाजासरशी नाथ जागे झाले अन् देवघराकडे आले.

'नाथांसारख्या सज्जनाकडे आपण चोरी करायला आलो म्हणून पडलो' असा विचार त्या सराईत चोराच्याही मनात डोकावून गेला. त्यामुळे नाथांना पाहताच त्याने त्यांच्यापुढे लोटांगण घातलं.

"क्षमा करा महाराज, माझी मोठीच चूक झाली."

"अरे बाबा! एवढ्या रात्री इथे येऊन अशी कोणती चूक केलीस?"

"चोरी करणार होतो आम्ही आपल्या घरी, हा आमचा मोठाच अपराध आहे महाराज."

त्या प्रमुख चोराचे साथीदार एवढा वेळ अंधारात दडून बसले होते, ते तिथे आले. तेही नाथांना नमस्कार करुन क्षमा-याचना करु लागले. चोरांनी आपली सर्व हकीकत अतिशय व्यथित मनाने नाथांना सांगितली. तेव्हा नाथ त्यांना म्हणाले, "आता तुम्ही करत असलेल्या पापाबद्दल पश्चाताप तुम्हांला झालाय ना? मग, पश्चातापासारखं प्रायश्चित नाही. आता पुन्हा कधी चोरी करणार नाही असा निर्धार करा, म्हणजे झालं. मिळेल ते काम करा. देव तुम्हांला उपाशी ठेवणार नाही. फक्त त्याची सतत आठवण ठेवा."

चोर ही तर माणसंच होती. पश्चातापाने पोळलेली. शिवाय चोरीच्या प्रयत्नात शिणलेली. तेव्हा त्यांना नाथ म्हणाले, "तुम्ही सारे खूप दमलात. उपाशी असाल तर गुळाबरोबर थोडं लाहीपीठ खा."

त्या चोरांसाठीही नाथांचं मन तुटत होतं. त्यांना रिकाम्या हातांनी परतवणंही त्यांच्या जीवावर आलं होतं.

आपल्या भांडारगृहातील आणता येतील तेवढ्या वस्तू आणून नाथांनी चोरांच्या पुढ्यात ठेवल्या आणि त्यांना म्हणाले, "आपल्याला यातील काय पाहिजे ते खुशाल घेऊन जा."

चोर अधिकच वरमले. गालावरुन मारुन घेत 'तोबा, तोबा, करत त्यांनी नाथांना हात जोडले, म्हणाले, "महाराज, आम्ही आन घेतो देवाची. आत्तापासूनच, फुकटचं काही घ्यायचं नाही अन् काही खायचं नाही."

नाथांनी त्यांना गूळ-पाणी अन् लाहीपीठ दिलं. रात्री तिथेच त्यांच्या विश्रांतीची सोय केली आणि सकाळी प्रेमाने निरोप दिला. ❖

# चित्रकथा

चित्रांकन व लेखन : अजय कालरा







सावकार नेहमी विचार करायचा, की आपल्यानंतर आपला कारभार कोण सांभाळणार ?
एके दिवशी त्याला एक युक्ती सुचली.
त्याने आपल्या तिन्ही मुलांना एकत्र बोलावून सांगितलं...
मुलांनो! जो कमीत कमी पैशांमध्ये माझी खोली पूर्णपणे भरुन दाखवेल तोच माझा कारभार पुढे सांभाळेल.


तिन्ही मुलं वेगवेगळ्या दिशेनं निघाली.
सर्वात लहान मुलगा कापसाच्या दुकानात गेला.
बाबा, बाबा! हे बघा, मी फक्त २००० रुपयात तुमची सगळी खोली भरुन टाकली.


बेटा! हे काय आहे?
बाबा, मी तर फक्त एक हजार रुपयात फुलं-पानं-काड्या आणून सगळी खोली भरुन टाकली.
अरे, बेटा तू अंधारात का उभा आहेस?
हे बघा बाबा! मी एक मेणबत्ती पेटवून ही संपूर्ण खोली प्रकाशाने भरुन टाकतो.
शाब्बास! बाळ
तूच माझा कारभार सांभाळण्यास लायक आहेस.
तर पाहिलंत मुलांनो, बुध्दिमान आणि सक्षम व्यक्ती हीच खऱ्या अर्थाने अधिकारास पात्र ठरते, नाही का?



दिन विशेष

# भारतीय नौदल दिन

भारतीय नौदल दिन दरवर्षी ४ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. यावेळी १ डिसेंबर ते ४ डिसेंबर हा नौदलाचा सोहळा यंदा पहिल्यांदाच सिंधुदुर्ग किल्ल्यावर साजरा होत आहेही महाराष्ट्रासाठी गौरवाची बाब आहे.

जगात चौथ्या क्रमांकाचे महाबलाढ्य नौदल म्हणून भारतीय नौदलाचा लौकिक आहे. १९७१ च्या भारत-पाक युध्दादरम्यान भारतीय नौदलाने पाकिस्तानच्या कराची बंदरावर हल्ला केला होता, त्यामुळे पाकिस्तानला पूर्ण शरणागती पत्करावी लागली होती. या विजयाचे स्मरण म्हणून दरवर्षी भारतीय नौदल दिन साजरा होतो. यामुळे संपूर्ण जगाला आपल्या नौदल सामर्थ्याची ओळख होते.

भारतीय आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कर्तृत्वाला अभिवादन म्हणून यंदाचा राष्ट्रीय नौदल दिवस सिंधुदुर्ग किल्ल्यावर साजरा होत आहे. किल्ल्यासमोरील समुद्रात भारतीय नौदलाच्या सामर्थ्याचे शक्तिप्रदर्शन केले जात असून यात ७० लढाऊ जहाजे सहभागी आहेत.

आधुनिक भारतीय नौदलाची स्थापना छत्रपती शिवाजी महाराजांनी केली होती; परंतु नंतर

औपचारिकपणे ब्रिटिशांनी त्याची स्थापना केली. रॉयल इंडियन नेव्हीची स्थापना १९३४ मध्ये झाली. जेव्हा २६ जानेवारी १९५० रोजी भारत गणराज्य बनले, तेव्हा त्याच दिवशी रॉयल इंडियन नेव्हीचे रुपांतरण भारतीय नौदल या नावाने झाले.


छत्रपती शिवाजी महाराजांनीच समुद्री व्यापाराचे संरक्षण करण्यासाठी कोकण आणि गोव्याच्या किनारपट्टीवर मजबूत नौदल निर्माण केले. महाराजांचे नौदल इतके मजबूत होते, की मराठ्यांनी ब्रिटीश, पोर्तुगीज आणि डच यांच्या सागरी स्वाऱ्या यशस्वी होऊ दिल्या नाहीत. शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील कल्याण, भिवंडी आणि गोवा या शहरांमध्ये लढाऊ नौदल तसेच व्यापारासाठी जहाजे बांधली. कान्होजी आंग्रे हे शिवाजी महाराजांचे नौदल प्रमुख होते.

भारतीय नौदल तीन भागात म्हणजे पश्चिमेत मुंबई, पूर्वेतील विशाखापट्टणम आणि दक्षिणेमध्ये कोची या ठिकाणी तैनात करण्यात आले आहे. भारतीय नौदलाने जल सीमेवर अनेक प्रमुख ऑपरेशनमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. नौदलाकडे १५५ युध्दनौका आहेत. नौदलाच्या हवाई शाखेत ध्रुव, चेतक, सी किंग इत्यादी शस्त्रसज्ज हेलिकॉप्टर्स व सी हॅरियर्स या लढाऊ विमानांच्या तुकड्या आहेत. मरीन कमांडो नौदलात आहेत. तसेच भारतीय नौदलाच्या आय. एन.एस. विक्रांत, विराट, डेली क्लास, त्रिशूळ, आयएनएस बेटवा आणि मिसाईलचा मारा करणारी नौका विनाश या नौका तसेच संकुश पाणबुडी हे सुध्दा नौदलाचे भाग आहेत.

प्राचीन किंवा पौराणिक काळातील भारतीयांचा समुद्राशी जवळचा संबंध होता. प्राचीन भारतातील सागरी राज्यांच्या राजांची स्वत:ची स्वतंत्र नौदल शक्ती होती. या जलसेनेचे वर्णन आपल्याला प्राचीन भारताच्या इतिहासात आणि पुराणांमध्ये आढळते. भारतात शिवाजी महाराजांच्या आधी दक्षिण भारतातील चोल आणि चालुक्य वंशाच्या राजांकडे जगातील सर्वात शक्तिशाली नौदलं होती. त्याचे वर्णन इतिहासात आढळते.

भारतातील जलवाहतूक आणि नेव्हिगेशनची कला ६००० वर्षांपूर्वी सिंधू नदीत उगम पावली. ऋग्वेदात बोटीने समुद्र पार करण्याचे अनेक संदर्भ आहेत. ऋग्वेदात भारताच्या पूर्व आणि पश्चिम सागरी मार्गाने व्यापाराचा उल्लेख आहे, त्यांनाच आज बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्र म्हणतात. ❖





# खरी तपश्चर्या

एक साधू होता. त्याने खडतर तपश्चर्या करुन सिध्दी प्राप्त केली होती. त्यामुळे अनेक लोक त्याच्या दर्शनाला जात असत. एके दिवशी महादेव नावाचा एक सज्जन आपल्या मुलासह साधूच्या दर्शनाला गेला. साधूला आपल्या सिध्दीचा अतिशय अभिमान असल्याचे त्याला जाणवले. महादेवने साधूला विचारले, "महाराज! आपल्याला कोणती सिध्दी प्राप्त झालेली आहे?" त्यावर साधू मोठ्या गर्वाने म्हणाला, "मी बसल्या जागी समोर ठेवलेली वस्तू इथे आणू शकतो." असे म्हणून त्याने समोर ठेवलेलं फळ सिध्दीच्या साह्याने आपल्याकडे खेचून घेतलं. महादेवानं पुन्हा विचारलं, "महाराज, ही सिध्दी प्राप्त करण्यासाठी आपल्याला किती वर्षे साधना करावी लागली?" साधू म्हणाला, "तब्बल पंचवीस वर्षे खडतर तपश्चर्या करुन मी ही सिध्दी प्राप्त केलेली आहे." त्यावर महादेव हसत हसत म्हणाला, "महाराज! ही सिध्दी तर मलाही प्राप्त आहे. मी पण इथे बसल्या बसल्या कुठलीही वस्तू सहज मागवू शकतो." हे ऐकताच क्रोधित होत

उर्वरित पान क्र. २४ वर



# परोपकाराची भावना

दिनेश रोज सकाळी तलावाजवळ फेरफटका मारायला जात असे. त्याला तेथे नेहमी एक आजी दिसायच्या. त्या कधी पक्ष्यांना दाणे टाकत असत तर कधी तलावातील माशांना खाणं देत. कधी तलावातील कासवांची पाठ देखील स्वच्छ करुन त्यांना आंघोळ घालत. दिनेश हे रोजच पाहत होता. शेवटी न राहवून एके दिवशी त्याने आजींना विचारलं, "आजी, मी नेहमी पाहतो, की तुम्ही तलावाच्या काठावर विसावलेल्या कासवांची पाठ स्वच्छ करता, माशांना खाणं देता किंवा या परिसरातील पक्ष्यांना दाणे टाकता, या मागचं कारण तरी काय आहे? कारण यापैकी कोणीही तुम्हाला मदत करु शकत नाही. मग हा अट्टाहास कशासाठी करता?" आजी दिनेशकडे मायेनं बघत म्हणाल्या, "बाळ! मला लहानपणापासूनच प्राणी-पक्षी यांची खूप आवड आहे. म्हणून मी रोज इथं येते. मला या मुक्या जीवांसोबत वेळ घालवायला खूप आवडतं. त्यांना खाऊ घालताना, त्यांची सेवा करताना माझ्या मनाला खूप समाधान मिळतं. राहिला प्रश्न कासवांचा, तर या कासवांची पाठ स्वच्छ करुनही मला एक आंतरिक समाधान मिळतं. कारण या कासवांच्या पाठीवर जे कवच

असतं ना, त्यावर कचरा जमा झाला, की त्यांची उष्णता निर्माण करण्याची क्षमता कमी होते. बरेच दिवस जर हा कचरा तसाच राहिला तर त्यांना पोहताना देखील त्रास होतो. पुढे पुढे तर त्यांचं कवच कमजोर होऊन त्याच्या जीवालाही धोका निर्माण होऊ शकतो. त्यांचं जीवन सुखमय व्हावं म्हणूनच मी हे सगळं करते हो!"

हे ऐकून दिनेश खूपच प्रभावित झाला. आजींच्या सेवेचं त्याला कौतुक तर वाटलंच; पण कासवांबद्दल आजीला असलेली माहिती पाहून आश्चर्यही वाटलं. तरीही त्याच्या मनात आणखी एक प्रश्न निर्माण झाला. तो म्हणाला, "आजी, तुम्ही नक्कीच खूप छान काम करत आहात; पण या तलावात तर खूप मासे आहेत, कासवही बरेच आहेत. त्यांच्यापर्यंत तर तुम्ही पोहचूही शकत नाहीत, मग त्यांचं काय? तुमच्या एकट्याने त्यांना असा काय फरक पडणार आहे?" त्यावर आजी दिनेशला समजावत म्हणाल्या, "बाळा, भलेही माझ्या एकटीमुळे सगळ्या प्राणी-पक्ष्यांचं जीवन सुखमय होणार नाही; पण जे जे माझ्या सान्निध्यात येतील, त्यांचं तर जीवन सुखमय होईल! यातच मला समाधान आहे. अशा रीतीने आपण सगळ्यांनीच जर परोपकाराची भावना बाळगली, तर ह्या देशांमध्ये नक्कीच बहुसंख्य लोकांचं, प्राण्यांचं, पक्ष्यांचं जीवन सुखमय होईल. कारण म्हटलेलंही आहे -

एक के करने से ज्यादा असर नही होता, पर....
एक-एक के करने से जरुर फरक पडता है ❖

- संकलन - रुचा कुमटेकर (कल्याण)

# खरी तपश्चर्या

(पान २२ वरुन)

साधू म्हणाला, "तुझ्यासारख्या तुच्छ जीवाला हे कसं शक्य आहे?" महादेवानं आपल्या मुलाला हाक मारत म्हटले, "बाळ! तो समोर ठेवलेला तांब्या घेऊन ये बरं." महादेवाचा मुलगा पटकन उठला आणि समोर ठेवलेला तांब्या घेऊन आला. साधू म्हणाला, "यात कसली आली सिध्दी?"

महादेव शांतपणे म्हणाला, "महाराज! जे काम तुम्ही तुमच्या मुलाकडूनही करवून घेऊ शकला असता, त्यासाठी तुम्ही आयुष्याची पंचवीस वर्षे वाया घालवली. आपल्या कुटुंबाला वाऱ्यावर सोडलं. यातून तुम्हाला काय प्राप्त झालं?.... केवळ अभिमान! मी बघा, कष्ट करुन माझ्या कुटुंबाचं पालन पोषण केलं. मुलांना शिकवलं. त्यांना योग्य संस्कार लावले, सत्संगाशी जोडलं. त्यामुळे माझी मुलं प्रत्येक काम सेवा भावनेनं करतात. माझ्या आज्ञेचं पालन करतात. महाराज! खरी तपश्चर्या तर हीच आहे, की गृहस्थाश्रमात राहून कुटुंबाचं पालन पोषण करणं, मुलांना योग्य ते सेवाभावनेचे संस्कार देणं. त्यांना चारित्र्यसंपन्न बनवणं. अन्यथा संस्काराविना अनेक मुलं आई-वडिलांचा अनादर करतात. वाईट संगतीला लागतात. यासाठी आधी स्वत:ला शिस्त लावून घ्यावी लागते. तरच आपण ती कुटुंबाला लावू शकतो. या सिध्दीपुढे तुम्ही मिळवलेली सिध्दी काय कामाची महाराज! याचा तुम्हीच विचार करा."


महादेवाचा प्रत्येक शब्द साधूच्या कानामध्ये आघात करत शिरत होता. पश्चातापाशिवाय साधूकडे काही उरलं नव्हतं. ❖



# ज्ञानप्राप्तीची तहान असावी

ज्ञानप्राप्तीसाठी जशी गुरुच्या कृपेची आवश्यकता असते, तशी जिज्ञासूलाही ज्ञानाची तीव्र जिज्ञासा असावी लागते. एकदा स्वामी रामकृष्णांकडे एक जिज्ञासू आला. तो म्हणाला, "स्वामीजी मला ईश्वराच्या दर्शनाची इच्छा आहे, ते कसे होईल ?" स्वामीजींनी त्याला नदीवर नेले आणि पाण्यात उडी मारायला सांगितली. जिज्ञासूने पाण्यात उडी मारताच स्वामीजींनी त्याची मान धरुन त्याचं डोकं पाण्यात बुडवून दाबून धरलं. नाका-तोंडात पाणी जाऊन त्याचा जीव गुदमरु लागला. तो कसातरी धडपडत बाहेर आला. स्वामीजी त्याला म्हणाले, "जेव्हा मी तुला पाण्यात बुडवून ठेवलं तेव्हा तुझ्या मनात कोणती इच्छा निर्माण झाली ?" तो म्हणाला, "पाण्याच्या बाहेर येऊन श्वास घ्यावा एवढी एकच धडपड होती. बाकीच्या गोष्टींचा विचार येण्याचा प्रश्नच नव्हता." त्यावर स्वामीजी म्हणाले, "पाण्यात बुडल्यावर श्वास घेण्याची जी तडफड असते, व्याकूळता असते; तशी अवस्था ईश्वरप्राप्तीसाठी असायला पाहिजे. भवसागर पार करण्याची तीव्र इच्छा असायला पाहिजे."

आत्म्याला परमात्म्याच्या भेटीची तहान (ओढ) लागलेली असते; परंतु मनुष्य आत्म्याची तहान भागविण्यासाठी परमात्म्याचा शोध घेण्याची तसदी घेत नाही. शरीराला जर पाण्याची तहान लागली तर मात्र गल्लोगल्ली फिरतो. जो भेटेल त्याला विचारतो, "खूप तहान लागली आहे, प्यायला पाणी मिळेल का हो कुठे ?" मग कुणीतरी सांगतं, की पुढच्या गल्लीत जा. तिथे पाण्याचा नळ आहे. हा तिथे धावत जातो; परंतु तिथेही पाणी नसतं. हताश होतो. पुन्हा पुढे जातो. आणखी कुणाला तरी विचारतो. तिथेही पाणी मिळाले नाही तर तो तिथेच थांबून राहत नाही. तहानेने व्याकूळ झाल्यामुळे जोपर्यंत पाणी मिळत नाही तोपर्यंत त्याला चालावेच लागते. तसं ईश्वरभेटीसाठी, आत्मसाक्षात्कारासाठी माणसाला प्रयत्नशील असायला हवं. अडोल, अमर, अविनाशी, कणकणवासी परमात्म्याचा बोध करुन घेण्याची तळमळ जर त्याच्यात असेल तर हे कार्य तो कधीच उद्यावर ढकलणार नाही. जर या क्षणी मला भूक व तहान लागलेली आहे, आणि मी जर म्हटलं, की "मला आता वेळ नाही, मी उद्या जेवणार, परवा पाणी पिणार" तर हे शक्य होईल का ? कदापि नाही, तिथं विलंब झालेला चालणार नाही. मन कशातही रमणार नाही, अशा तऱ्हेनं ध्रुवबाळासारखी, भक्त प्रल्हादासारखी ईश्वरप्राप्तीची भूक असेल तर पावलं आपोआपच सत्संगाकडे वळतील, पाण्यावाचून माशाची जी अवस्था होते. तशीच अवस्था प्रभुविना होत असते.❖





# रामानुजन श्रीनिवास

भारतीय गणितज्ज्ञ रामानुजन श्रीनिवास यांचा जन्म २२ डिसेंबर १८८७ रोजी तामिळनाडूतील तंजावर जिल्ह्यात एरोड येथे गरीब ब्राह्मण कुटुंबात झाला. कुंभकोणम या गावात त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. त्यांनी प्रारंभी स्वतःच त्रिकोणमितीचा अभ्यास केला. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांनी लेनर्ड ऑयलर यांनी पूर्वसूचित केलेली ज्या व कोज्या यासंबंधीची प्रमेये मांडली. १९०३ मध्ये त्यांना जी. एस. कार यांचा सिनॉप्सीस ऑफ एलिमेंटरी रिझल्टस इन प्युअर अँड ॲप्लाईड मॅथेमॅटिक्स हा ग्रंथ अभ्यासण्याची संधी मिळाली. या ग्रंथात सुमारे ६००० प्रमेये होती व ती सर्व १८६० सालापूर्वीची होती. या ग्रंथामुळे रामानुजन यांच्या कुशाग्र बुध्दीला चालना मिळाली. त्यांनी कार यांच्या ग्रंथातील प्रमेये पडताळून पाहिली; परंतु त्यापूर्वी त्यांचा गणितावरील चांगल्या प्रमाणभूत ग्रंथाशी संपर्क न आल्याने त्यांना प्रत्येक वेळी स्वतः मूलभूत संशोधन करावे लागले. या कार्यात त्यांनी अनेक नवीन बैजिक श्रेणीही शोधून काढल्या. १९०४ मध्ये कुंभकोणम येथील शासकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला व शिष्यवृत्तीही मिळाली. त्यांचे प्राध्यापक पी.व्ही. शेषू अय्यर यांना रामानुजन यांचे गणितातील असामान्य प्रभुत्व जाणवले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली रामानुजन यांचे वाचन व संशोधन चालू झाले; परंतु गणिताचा सतत अभ्यास करण्याच्या नादात त्यांनी इंग्रजी भाषा व इतर विषयाकडे दुर्लक्ष केल्याने ते परीक्षेत अनुत्तीर्ण झाले. त्यामुळे शिष्यवृत्ती बंद झाली. १९०६ मध्ये पुन्हा ते परीक्षेला बसले; परंतु परत अनुत्तीर्ण झाल्याने त्यांनी परीक्षेला बसण्याचा नाद सोडून दिला. त्यानंतर काही वर्षे निश्चित असा कोणताच व्यवसाय नव्हता. मात्र गणितातील आपले स्वतंत्र कार्य त्यांनी पुढे चालू ठेवले.

उपजीविकेसाठी रामानुजन यांनी मद्रास पोर्ट ट्रस्टच्या कार्यालयात नोकरी केली. याच वेळी त्यांनी

जनरल ऑफ द इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटी या नियतकालिकात आपले लेखन प्रसिध्द करण्यास सुरुवात केली. त्यापैकी पहिला निबंध बर्नुली संख्यासंबंधी होता आणि त्यानंतर श्रेणी व अनंत गुणाकार आणि p चे मूल्य काढण्यासाठी भूमितीय रचना यासंबंधी त्यांनी लिहिले. त्यांच्या गणितीय कार्यात रस असणाऱ्या काही मित्रांनी प्रोत्साहन दिल्याने रामानुजन यांनी केंब्रिज येथील गणिताचे प्राध्यापक सर गॉडफ्री हॅल्ड हार्डी यांच्याशी पत्रव्यवहार सुरु केला. पहिल्या पत्रात त्यांनी अविभाज्य संख्यांच्या वितरणासंबंधीच्या आपल्या संशोधनाविषयी, तसेच गणिताच्या विविध शाखेत स्वतः शोधलेल्या शंभराहून अधिक प्रमेयांसंबंधी लिहिले. या पत्रव्यवहाराने हार्डी प्रभावित झाले व त्यांनी रामानुजन यांना केंब्रिजला येण्याचे निमंत्रण दिले; परंतु त्यांनी ते धार्मिक कारणास्तव नाकारले. त्यामुळे त्यांना मद्रास विद्यापीठाची दोन वर्षे शिष्यवृत्ती मिळण्याची व्यवस्था करण्यात आली. पुढे हार्डी यांचे सहकारी ई.एच. नेव्हिल मद्रास येथे आलेले असता त्यांनी प्रयत्नपूर्वक रामानुजन यांची संमती मिळवली आणि रामानुजन यांना केंब्रिज येथील ट्रिनिटी कॉलेजात प्रवेश देण्यात आला. हार्डी व जे.ई. लिटलवुड यांच्या मार्गदर्शनाखाली रामानुजन याचा झपाट्याने विकास झाला. त्यांच्या मदतीने रामानुजन यांचे निबंध इंग्लीश व इतर युरोपीय नियतकालिकात प्रकाशित झाले. इंग्लंडमधील पाच वर्षांच्या वास्तव्यात त्यांचे २१ निबंध प्रसिध्द झाले.

हार्डी यांच्या मते रामानुजन यांची बुध्दिमत्ता आधीच ओळखली गेली असती तर, ते तुलनेने एक फार मोठे गणितज्ज्ञ झाले असते. त्यांचे गणितातील ज्ञान आश्चर्यकारक होते व त्यातील बहुतेक त्यांनी स्वतःच प्राप्त केलेले होते. पारंपरिक अपूर्णांकासंबंधी काय विकसित केले गेलेले आहे याबाबत त्यांना काहीच माहिती नव्हती. तरीही या विषयातील त्यांचे ज्ञान त्याकाळच्या इतर गणितींच्या तुलनेने अनन्यसाधारण होते. विवृत्तीय समकाल, अतिगुणोत्तरिय श्रेणी, रीमान श्रेणी, झीटा फलनाची समीकरणे व त्यांचा स्वतःचा अ श्रेणीसंबंधीचा सिध्दान्त हे त्यांनी स्वतः संशोधन करुन शोधून काढले. या उलट गणिताचे पध्दतशीर प्रशिक्षण न मिळाल्याने किंवा उत्तम दर्जाचे ग्रंथालय उपलब्ध नसल्याने त्यांच्या ज्ञानातील वैगुण्येही तितकीच आश्चर्यकारक होती. गणितीय सिध्दतेविषयीची त्यांची कल्पना अतिशय संदिग्ध अशी होती. अविभाज्य संख्येसंबंधीची त्यांची अनेक प्रमेये त्यांच्या बुध्दीची चमक दाखवीत असली, तरी ती पुढे चुकीची ठरली. इंग्लंडमधील वास्तव्यात त्यांनी p चे आसन्न मूल्य काढण्याच्या निरनिराळ्या पध्दती दिलेल्या होत्या. त्यानंतर त्यांनी संख्या विभाजन फलनाच्या गुणधर्माविषयी काम केले. ते अतिशय मोलाचे मानले जाते.

त्यांनी संख्या सिध्दांतात केलेले कार्य भौतिक व संगणकीय विज्ञानातील समस्या सोडविण्यासाठी आजही उपयुक्त ठरत आहेत. त्यांच्या कार्याचा विविध देशातील गणितज्ज्ञ आजही अभ्यास करीत आहेत. १९१७ मध्ये रामानुजन क्षयरोगाने आजारी पडले. त्यामुळे इंग्लंडमधील त्यांचे उर्वरित वास्तव्य निरनिराळ्या आरोग्यधामात गेले. प्रकृतीत सुधारणा झाल्यावर ते १९१९ मध्ये भारतात परत आले. चेन्नई विद्यापीठाने दरसाल २५० पौंडाची शिष्यवृत्ती पाच वर्षांकरिता मंजूर केली. परंतु चेन्नईजवळ कुंभकोणम येथे २६ एप्रिल १९२० मध्ये त्यांचे निधन झाले. ते अखेरपर्यंत गणिताच्या संशोधनात मग्न होते. त्यांचे सर्व संशोधन कार्य जी.एच. हार्डी, पी.व्ही. शेषू अय्यर व बी.एम. विल्सन यांनी संपादित करुन कलेक्टेड पेपर्स ऑफ श्रीनिवास रामानुजन या शीर्षकाखाली प्रसिध्द केले. ❖



भ्रमंती

# पाटणादेवीचा कन्हेरगड

अजंठा सातमाळच्या डोंगरातील हा गिरिदुर्ग चाळीसगाव पासून १८ किमी अंतरावर असलेल्या गौताळा अभयारण्याच्या निसर्गरम्य परीसरात प्रसिध्द पाटणादेवी मंदिराच्या मागे आहे. या डोंगररांगेत धवलतीर्थ, केदारेश्वर, केदारकुंड, पितळखोरे लेणी, हेमाडपंथी महादेव मंदिर, कन्हेरगड अशी पौराणिक व ऐतिहासिक महत्त्व असलेली ठिकाणं आहेत. पाटणा गावातील हेमाडपंथी मंदिराच्या मागेच कन्हेरगड आहे. हेमाडपंथी मंदिराच्या मागील डोंगरावर नागार्जुन कोठडी, सीता न्हाणी व शृंगार चावडी ही ३ लेणी खोदलेली आहेत. कन्हेरगड किल्ला कान्हेरगड या नावानेही ओळखला जातो.

देवगिरीच्या यादवांच्या काळात हा भाग विज्ज्लगड या नावाने प्रसिध्द होता. शुन्याचा शोध लावणारे महान गणिती भास्कराचार्य यांचा जन्म व वास्तव्य विज्जलगड परीसरात इ.स. १११४ ते इ.स.११८५ या काळात होते.

गौताळा अभयारण्यापासून पाटणादेवी मंदिरापर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर अभयारण्याच्या गेटपासून १.५ किमी अंतरावर महादेव मंदिर अशी पाटी आहे. या मंदिराच्या मागेच कन्हेरगड आहे. पाटणा गावाच्या पुढे रस्त्यावरुन उजव्या बाजूला वळून ५ मिनिटात आपण पुरातन हेमाडपंथी महादेव मंदिरापाशी पोचतो. मंदिराच्या बाजूने (मंदिर उजव्या बाजूला ठेवून) जाणाऱ्या पायवाटेने मंदिराच्या मागे जावे. थोडे अंतर चालल्यावर पायवाटेने डावीकडे वळावे. पुढे सरळ जाणारी पायवाट सोडून उजवीकडे जाणारी पायवाट पकडावी. येथे सिमेंटमध्ये बांधलेली एक छत्री (समाधी) आहे. ही समाधी ओलांडली की आपण कन्हेरगडाच्या पायथ्याशी पोचतो. मंदिरापासून गड पायथ्याला जाण्यास १० मिनिटे



पाटणादेवी मंदिर



हेमाडपंथी महादेव मंदिर

लागतात. कन्हेरगडाचा डोंगर आग्नेय-वायव्य पसरलेला आहे.

सीता न्हाणी लेणी पाहून पायवाटेने ५ मिनिटे चालत गेल्यावर आपण डोंगराच्या वायव्य टोकाकडे पोचतो. इथे कातळात पायऱ्या कोरलेल्या आहेत. या ठिकाणी आता लोखंडी रेलिंग लावण्यात आलेले आहे. पायऱ्यांनी वर चढून गेल्यावर आपला किल्ल्यावर प्रवेश होतो. खालच्या पाटणा गावातून येणारी ठळक पायवाट या ठिकाणी येऊन मिळते. पाटणा गावातील लोक याच वाटेने गडावर किंवा पलीकडच्या गावात जातात. प्रथम गडावर न जाता राहिलेलं तिसरं लेण म्हणजे शृंगार चावडी लेणी प्रथम पाहून घ्यावी. त्यासाठी (रॉक पॅच) खालून जाणाऱ्या




माथ्यावरील हनुमान मूर्ती

पायवाटेने डोंगराला वळसा घालून सरळ चालत जावे. शृंगार चावडी लेणी पाहून परत कातळकड्याकडे येऊन, कातळकडा चढून एक वळण घेतल्यावर तटबंदीचे अवशेष दिसू लागतात. तटबंदी ओलांडून आपला किल्ल्याच्या माचीवर प्रवेश होतो. माचीवरुन उजव्या बाजूला त्रिकोणी आकाराचे डोंगराचे शिखर दिसते, तोच कन्हेरगडाचा माथा (बालेकिल्ला) आहे. माचीवर पूर्वेला कातळात जमिनीवर कोरलेलं पाण्याचं टाकं आहे. टाक्याच्या बाजून चढत जाणाऱ्या वाटेवर डाव्या बाजूला एक कबर पाहायला मिळते. पुढे २ मिनिटात एक ठळक पायवाट आडवी येते. या पायवाटेवर प्रथम उजवीकडे वळावे. थोडे चालत गेल्यावर डाव्या बाजूस २ बुजलेली पाण्याची खाली टाकी दिसतात. या टाक्यांच्या अलीकडे वरच्या बाजूस एक कबर आहे. हे सर्व पाहून मागे फिरावे, डोंगर उजव्या बाजूला व दरी डाव्या बाजूला ठेवत ५ मिनिटे चालल्यावर डाव्या बाजूला खाली पाटणादेवीचं मंदिर दिसायला लागतं, त्यामागे पितळखोरा लेण्यांचा डोंगर व त्याच्याही मागून डोकावणारा पेडका किल्ल्याचा आयताकृती माथा दिसतो. या पायवाटेने अजून ५ मिनिटे चालल्यावर आपण पश्चिमाभिमुख दरवाजापाशी येतो. या दरवाजाच्या दोन्ही बाजूंना भक्कम बुरुज आहेत. दरवाजाच्या आत

उर्वरित पान क्र. ३३ वर

# हसा मुलांनो हसा



एकदा एका प्राणिसंग्रहालयातील वाघाच्या पिंजऱ्याचे दार उघडे राहिले. त्यातून वाघ हळूच बाहेर आला. बाहेर खूप लोक उभे होते; पण त्याने एका चिनी माणसावर झडप घालून त्याला खाल्ले. त्याला पुन्हा पिंजऱ्यात बंद केल्यावर वाघिणीने त्याला विचारले, “इतकी माणसं असताना तू त्या चीनी माणसालाच का खाल्लंस ?” वाघोबा म्हणाला, खूप दिवसापासून चायनीज खायची इच्छा होती.

---

बन्या आणि विन्या एकदा एका दुकानात गेले. बन्याने तीन चॉकलेट चोरले. दुकानाबाहेर आल्यावर खिशातून चॉकलेट काढून दाखवत तो म्हणाला, “हे बघ, जादू! दुकानात एक पैसा पण खर्च न करता तीन चॉकलेट घेऊन आलो.”

विन्या म्हणाला, “चल दुकानात, मी पण तुला यापेक्षा भारी जादू दाखवतो.” विन्या दुकानदाराला म्हणाला, “तुम्ही मला तीन चॉकलेट द्या. मी तुम्हाला जादू दाखवतो.” दुकानदाराने उत्सुकतेने तीन चॉकलेट विन्याला दिले. विन्याने ते खाऊन टाकले. दुकानदार म्हणाला, यात कुठे आहे जादू ? विन्या म्हणाला, “बन्याचे खिसे तपासा. मी खाल्लेली तीनही चॉकलेट त्याच्या खिशात सापडतील.”

गाय, म्हैस आणि रेडा एका मंदिराशेजारी रवंथ करत बसले होते. मंदिरातून येणारे भाविक गाईला हात लावून नमस्कार करुन पुढे जात होते. ते पाहून म्हैस रेड्याला म्हणाली, “ते बघ, सगळी माणसं गाईच्या कपाळावर टपली मारुन जाताहेत; पण मला मात्र हात लावायची कुणाची हिम्मत नाही. आपला दराराच आहे तसा.” त्यावर रेडा फुशारकी मारत म्हणाला, “अगं, तुझा दादा आहे ना इथं, म्हणून कुणाची हिम्मत होत नाहीये, समजलं ?”


---

जगू : टेरेसवर उभा राहून काढलेल्या माझ्या फोटोला फेसबुकवर दीडशे लाइक्स मिळाल्या माहितीये ?

मगन : हे तर काहीच नाही. मी फेसबुकवर फक्त एवढंच स्टेटस टाकलं, की मी आज रात्री टेरेसवर झोपणार आहे मला पाचशे लाइक्स मिळाल्या.

जगू : काय म्हणतोस ? कोण आहेत एवढे लाइक्स देणारे ?

मगन : मच्छर!





गण्या : (पोलिस स्टेशनमध्ये) साहेब मला तक्रार नोंदवायची आहे. फोनवरुन सतत मला धमक्या येत आहेत.

पोलिस : कोण आहे तो, जो तुम्हाला धमक्या देत आहे ?

गण्या : साहेब, MSEB वाले म्हणतात, बिल भरलं नाही तर, कापून टाकीन.

छोटू : दादा, जेवणावरुन उठून गेलो तर जेवणाचा अपमान होतो. मग पाण्याचा अपमान कसा होतो रे ?

दादा : अरे वेड्या, सोप्पय! हे बघ आंघोळीसाठी पाणी तापवायचं आणि आंघोळच करायची नाही.



भूगोलाचे शिक्षक : पृथ्वी आणि चंद्र यांच्याबद्दल काय सांगता येईल ?

बंड्या : सर, पृथ्वी आणि चंद्र यांच्यात भावाबहिणीचं नातं आहे.

शिक्षक : ते कसं काय ?

बंड्या : कारण पृथ्वीला आपण माता म्हणतो आणि चंद्राला मामा म्हणतो.....

हौसाकाकू मतदान करायला गेल्या. मतदान अधिकाऱ्याने त्यांच्या बोटाला शाई लावली. त्यावर हौसाकाकूंची जिज्ञासा चाळवली.

हौसाकाकू : साहेब, ही शाई साबणाने धुतली तर जाईल का ?

अधिकारी : नाही.

हौसाकाकू : मग तेलाने जाईल का ?

अधिकारी : नाही. निदान वर्षभर तरी जाणार नाही.

हौसाकाकू : मग माझ्या केसांनाही लावाल का ?

बीना खूप हुशार विद्यार्थिनी होती. डेंटल कॉलेजला जाऊन ती दातांची डॉक्टर बनली. तिने स्वतःचा दवाखाना टाकला. दवाखान्याचा बोर्ड रंगवताना पेंटर म्हणाला, "मॅडम दवाखाना तुमच्या नावाचाच असेल ना ?" बीना मॅडम म्हणाल्या, "अर्थातच माझ्याच नावाचा बोर्ड असणार."

पेंटरने बोर्ड रंगवला - 'बीना दातांचा दवाखाना"

आई : चिंटू, लवकर आंघोळ करुन घे, नाहीतर शाळा बुडेल!

(थोड्या वेळाने) चिंटू, अरे अजून आंघोळ का केली नाहीस ?

चिंटू : अगं आई, या बादलीभर पाण्यात शाळा कशी बुडेल ते पाहतोय.

शिक्षक : राजू, दोन दिवस झाले तू शाळेत उशिरा का येतोयस ? उद्या येताना तुझ्या बाबांना घेऊन ये.

राजू : सर, बाबा हॉस्पीटलमध्ये आहेत.

शिक्षक : ठीक आहे, उद्यापासनं लवकर ये. (आठ-दहा दिवसांनी)

शिक्षक : राजू, हल्ली तू रोजच उशिरा येतोस, उद्या बाबांना घेऊन ये बरं!

राजू : सर, बाबा हॉस्पीटलमध्ये आहेत.

शिक्षक : अरे, तुझे बाबा अजून बरे झाले नाहीत का ?

राजू : तसं नाही सर, माझे बाबा डॉक्टर आहेत.



कथा

# स्वावलंबी बनावे

मित्रांनो! कुत्रा आणि मांजरीचे वैर आपणा सर्वांनाच ठाऊक आहे. एकदा एक मांजर रस्त्याने जात असताना अचानक त्याच्यासमोर एक मोठ्ठा आणि भयानक कुत्रा आला. त्या महाकाय कुत्र्याला पाहून मांजर खूप घाबरले. आपला प्राण संकटात आहे याची त्याला जाणीव झाली आणि ते वाट मिळेल तिकडे जीव मुठीत घेऊन पळू लागले; पण त्याची शक्ती कमी पडली. थोड्या वेळातच कुत्र्याने मांजराला गाठले. मांजर खूप घाबरले, मृत्यूला समोर पाहून गयावया करत सोडून देण्यासाठी विनवणी करु लागले. कुत्र्याने मांजराची विनवणी झिडकारुन लावत म्हटले, "आता तुला मी काही सोडणार नाही. खाऊन टाकणार." असे म्हणून तोंडाचा आ वासून त्याला ठार मारण्याची धमकी देऊ लागला.

स्वत:चा जीव वाचवण्यासाठी मांजराने कुत्र्यासमोर शेवटचा पर्याय म्हणून एक प्रस्ताव ठेवला ते कुत्र्याला म्हणाले, "जर तू मला, जीवदान दिलंस तर उद्यापासून तुला भोजनासाठी वणवण करण्याची आवश्यकता नाही. तुझ्या भोजनाची जबाबदारी उद्यापासून माझी आहे. मी रोज तुझ्यासाठी शिकार घेऊन येत जाईन आणि तू खाल्ल्यानंतर जर काही थोडंफार शिल्लक राहिलं तेच खाईन." मेहनत न करता मिळणाऱ्या भोजनावर रोज ताव मारता येईल या कल्पनेने कुत्रा मनोमन आनंदित झाला; परंतु मांजर खोटं बोलून निसटून जाऊ शकतं या जाणिवेने भानावर आला आणि मांजराला दरडावत म्हणाला, "जर तू मला दगा दिलास तर त्याचे परिणाम महाभयंकर होतील."

अशी धमकी देऊन त्याने मांजराला सोडून दिले आणि मांजराची वाट पाहू लागला. मांजरही ठरल्याप्रमाणे रोज त्याच्यासाठी शिकार करुन आणू लागले. मेहनत न करता आयती शिकार मिळू लागल्याने कुत्रा खूश होता. तो काहीही न करता दिवसभर आपल्या कपारीत झोपून राहत असे. असे करता करता एक महिना होत आला, पूर्ण महिनाभर कुत्रा कुठेही बाहेर गेला नाही. फक्त एका जागेवरच झोपून राहू लागला. कोणतीही हालचाल न केल्याने व शरीराला कोणताही व्यायाम न मिळाल्याने त्याचे वजन वाढले, तो खूप स्थूल झाला.

असेच एके दिवशी कुत्र्याला खूप भूक लागली होती. त्यामुळे नेहमीप्रमाणे तो मांजराची वाट पाहू लागला. मांजर मात्र येण्याचे नावच घेत नव्हते. शेवटी न राहून कुत्रा स्वतःच मांजराला शोधण्यासाठी बाहेर पडला. थोडे अंतर चालून गेल्यानंतर मांजर एका उंदराची शिकार करुन खात असलेले दिसले. त्याला मांजराचा प्रचंड राग आला. तो मोठ्याने गर्जना करत म्हणाला, "विश्वास घातकी मांजरा, तू तुझं वचन निभावलं नाहीस. आता मी तुला सोडणार नाही. ठार मारुन खाऊन टाकणार." असे म्हणून त्याने मांजरावर झेप घेतली; पण आधीपासूनच सतर्क असलेल्या मांजराने धूम ठोकली. वाढलेल्या वजनामुळे कुत्र्याला जास्त काळ मांजराचा पाठलाग करणे शक्य झाले नाही. तो लवकरच थकला. मांजर काही त्याच्या हाती लागले नाही.

मित्रांनो, दुसऱ्यावर अवलंबून राहिल्यामुळे आपण आळशी होतो. आपली शारीरिक क्षमता देखील कमी होत जाते. त्यामुळे जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वावलंबी बनावे! एक सुभाषित देखील आहे -

जो दुसऱ्यावरी विसंबला। त्याचा कार्यभाग बुडाला।
जो स्वयेची कष्टत गेला। तोचि भला।। ❖

- संकलन - रुपाली शिंदे (अंबरनाथ)

## पाटणादेवीचा कन्हेरगड (पान २९ वरुन)

पहारेकऱ्यांसाठी देवड्या आहेत. दरवाजाच्या बाहेर डाव्या बाजूला, खालच्या बाजूस कातळात एक खाच केलेली दिसते, या ठिकाणी किल्ल्याचा पुरातन दरवाजा असावा.

दरवाजा पाहून पुन्हा किल्ल्यात प्रवेश करावा. दरवाजा जवळून एक पायवाट किल्ल्याच्या माथ्याकडे जाते. या पायवाटेने किल्ल्याच्या माथ्यावर असलेल्या कातळ टोपीच्या खाली जाता येते. येथे उजवीकडे वळून (दरवाजाच्या विरुध्द दिशेला) डोंगर डाव्या बाजूला व दरी उजव्या बाजूला ठेवत ५ मिनिटे चालल्यावर डाव्या बाजूला वरच्या अंगाला कातळात कोरलेलं खांब टाकं आहे. ते पाहून ५ मिनिटे चालल्यावर आपण माथ्याच्या वायव्य टोकाकडे पोचतो. येथे उजव्या बाजूला काही पायऱ्या दिसतात. पायऱ्या चढून गेल्यावर तटबंदीचे व उध्वस्त दरवाजाचे अवशेष दिसतात, गडमाथ्यावर वाड्याचा चौथरा, एक कबर, हनुमानाची मूर्ती व एक कोरडं पाण्याचं टाकं आहे. मागे पितळखोरा लेण्यांचा डोंगर व त्याच्याही मागून डोकावणारा पेडका किल्ल्याचा आयताकृती माथा दिसतो. गडमाथा पाहून पायऱ्या उतरुन पायवाटेने परत न जाता सरळ खाली उतरावे. ही वाट बुजलेल्या खांब टाक्यांपाशी येते.

कन्हेरगड लेण्यांसह पूर्ण पाहण्यासाठी २ ते ३ तास लागतात.

जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव हे महत्त्वाचे शहर रेल्वेने व रस्त्याने सर्व महत्वाच्या शहरांशी जोडलेले आहे. अभयारण्याचे गेट सकाळी ६.०० ते संध्याकाळी ६.०० पर्यंत उघडे असते. चाळीसगावातून सकाळी ६.०० पासून दर अर्ध्या तासाने पाटणादेवीला जाण्यासाठी एसटीची बससेवा आहे. त्याशिवाय चाळीसगावातून पाटणादेवीला जाण्यासाठी ६ आसनी रिक्षापण उपलब्ध आहेत. ❖



# थंडी पडली

थंडी खूप वाढली चला काढू रजई
आईची माया देते उबदार ती दुलई

हातमोजे घालू अन् पायमोजेही घालू या
कान टोपी सुरेख मऊ शाल ओढू या

ऋतू शिशिर मज आवडे फार-फार
झोपायला मिळते निवांत घटकाभर

मस्त मजा देईल शेकोटीची कमाल
करु चला आगळी हुर्डा पार्टी धमाल

लागता अवकाळी पावसाची हजेरी
तुषार अंगावरी रोमांच उभे करी

कधी गुलाबी तर कधी थंडी बोचरी
कोवळी सूर्यकिरणे घेऊ या अंगावरी

गरमागरम काढा मसालेदार चहा
भुर्रकन पिऊन छान वाटते पहा

ऊब देते जीवाला प्रेमाची ती फुंकर
मुक्या जनावरांना देऊ नका हो अंतर

- मनीषा साळुंखे (मीरा रोड)





# आपुलकीचा भाव

अमेरिकेतील सर्वधर्मपरिषद संपन्न झाल्यानंतर अनेक देशांमध्ये व्याख्यानं देत देत स्वामीजी भारतात यायला निघाले. परतीच्या प्रवासात स्वामीजींची बोट एडन बंदरात थांबली. दिवसभराच्या विश्रांतीसाठी बोट एडन बंदरात थांबणार असे बोटीच्या कॅप्टनने सांगितले, तेव्हा स्वामीजींच्या सोबत असलेले काही परदेशी शिष्य स्वामीजींना एडनमधील प्रेक्षणीय स्थळं बघण्याची विनंती करु लागले. बंदरापासून प्रेक्षणीय स्थळं जवळपास तीन-चार मैलांवरच होती.

स्वामीजी आणि सारे शिष्य पायीच निघाले, एक दोन स्थळं पाहून झाल्यावर ते आणखी पुढे निघाले. पुढे जात असताना वाटेत त्यांना एक भारतीय व्यक्तीचं दुकान दिसलं. दुकान छोटेसंच होतं. स्वामीजी शिष्यांना म्हणाले, तुम्ही निघा पुढे! आणखी काही स्थळं पाहायची असतील पाहून या तोपर्यंत मी या दुकानात थांबतो.

खूप दिवसानंतर भारतीय माणसासोबत भारतीय भाषेत बोलण्याचा आनंद काही वेगळाच असतो. स्वामीजी त्या दुकानात गेले. दुकानदाराशी मनमोकळेपणाने गप्पा मारु लागले. तिकडे शिष्यगण प्रेक्षणीय स्थळ पाहून परत यायला निघाले. त्यांना वाटलं त्या छोट्याशा दुकानात बसून स्वामीजी कंटाळले असतील, म्हणून ते झपझप पावलं उचलत निघाले. स्वामीजी दुकानावर आरामात बसलेले त्यांना दिसले. जणू काही स्वतःच्याच दुकानात बसले आहेत असं ते दृश्य खूप मजेदार वाटत होतं.

दुकानदारासोबत गप्पा मारत हास्य विनोद करत होते. कधी लहान बालकांसारखं दुकानातील डब्यात ठेवलेलं चॉकलेट काढून खात होते. त्यांचा सरळ आणि सहज स्वभाव, देशबांधवांविषयी असलेली आपुलकी व प्रेम आणि लहानसहान गोष्टीतून आनंद घेण्याची वृत्ती बघून कॅप्टन सेवियर आणि सारे परदेशी शिष्य खूपच प्रभावित झाले. ज्यांना मोठमोठ्या लोकांनी आपल्या भेटीसाठी सन्मानाने आमंत्रणं पाठवली, असे महान तत्त्वचिंतक स्वामीजी एका छोट्याशा दुकानदाराबरोबर किती मनमोकळेपणाने गप्पा मारत आहेत, हे दृश्यच त्यांच्या विशाल हृदयाची साक्ष देत होते. सर्वांमध्ये ते इतक्या सहजपणे एकरुप होत असतं, की प्रत्येकाला ते आपल्या परिवाराचेच सदस्य आहेत असं वाटू लागे.

- संकलन - हसती दुनिया टीम



# निरोगी जीवनासाठी गाजर



गाजर हे भरपूर पोषकतत्व असलेलं कंदमुळ आहे. गाजरात भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन्स, मिनरल्स, अँटीऑक्सिडंट आणि विटा केरोटीन असतात. गाजराच्या नियमित सेवनाने शरीराचे योग्य पोषण होते. थंडीत गाजरचा हलवा हमखास केला जातो. थोडक्यात, गाजर हे अन्नाप्रमाणेच एक उत्तम औषधही आहे. गाजरमध्ये ९५ टक्के पाण्याचे प्रमाण असते.

☞ **दृष्टी सुधारते :-** गाजरात मुबलक प्रमाणात व्हिटॅमिन ए, बी, सी, डी आणि ई असल्यामुळे ते डोळ्यांच्या आरोग्यासाठी देखील उत्तम ठरते. गाजराचा रस नियमित प्यायल्याने दृष्टी उत्तम राहते.

☞ **रक्तदाब नियंत्रित राहतो :-** गाजरात फायबर्स, पोटॅशियम, व्हिटॅमिन सी असे अनेक पोषक घटक असतात. त्यामुळे रक्तदाब नियंत्रित राहतो.

☞ **रोग प्रतिकारक शक्ती वाढते :-** व्हिटॅमिन ए मुळे शरीराचे कार्य सुरळीत चालते आणि अनेक रोगांपासून संरक्षण होते.

☞ **वजन कमी करण्यासाठी :-** कच्च्या गाजरामध्ये अंदाजे ८८ टक्के पाणी असतं. शिवाय एका मध्यम आकाराच्या गाजरात जवळपास २५ कॅलरीज असतात. त्यामुळे वजन नियंत्रित ठेवण्यासाठी आहारात गाजर असावे. गाजरातील फायबर्समुळे पोट भरल्यासारखे वाटते.

☞ **निरोगी हृदयासाठी :-** गाजर नियमित सेवन केल्याने शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. शरीराला अँटिऑक्सिडंटचा पुरवठा होतो. म्हणूनच हृदयाचे आरोग्य चांगले राहते.

☞ **सुरकुत्या कमी होतात :-** वयोमानानुसार प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वयाच्या खुणा दिसू लागतात. तसेच धूळ, माती, प्रदूषण यांचाही परिणाम त्वचेवर होत असतो. डाकड सर्कल्स अथवा डोळ्याखालची काळी वर्तुळं कमी करण्यासाठी दररोज गाजराचा रस सेवन करावा.

☞ **त्वचेचे आजार बरे होतात :-** गाजरमधील अँटीऑक्सिडंट घटकामुळे शरीरातील रक्त शुध्द होते. गाजराच्या सेवनाने त्वचेच्या समस्या कमी होतात. त्वचेचा कोरडेपणा कमी होतो. चेहऱ्यावरील डाग आणि व्रण कमी होतात.


☞ **केस गळतीवर उपयुक्त :-** काळेभोर, घनदाट केसांसाठी आहारात गाजराचा समावेश करावा. त्यामुळे केस गळणंदेखील कमी होऊ शकतं. गाजरामधील पोषक घटकांमुळे केस कमकुवत होणं, केसांना फाटे फुटणं, केस कोरडे आणि निस्तेज होणं कमी होतं. ❖




# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



शार्वी तिर्लोटकर



रुहानी नार्वेकर



अवंतिका कुंभार



दिव्यश्री साठे




प्रणव मोरे



दिशा पाटील




साधिक वाघमारे



प्रतिश मोरे



ओजस्वी पवार



ज्ञानेश्वरी देवकर



संवेद पाटील

वाढदिवसाचे फोटो किमान दीड महिना आधी पाठवावेत.

# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालरा







का बरं ? चिंटू तू का नाही येणार ? हॅ हॅ हॅ... तुझ्याकडे तर जत्रेमध्ये मज्जा करण्यासाठी पैसे देखील नसतील ना !
अं हं हं.... तू नेहमी माझी चेष्टा करतेस किट्टी !
किट्टी, कुणाची अशी चेष्टा तू कधी करु नकोस.


बघा, बघा! माझी नवीन पर्स! यात खूप सारे पैसे आहेत. आपण जत्रेत खूप मज्जा करु या.
किट्टी, तू तुझी पर्स सांभाळ हं, जत्रेत खूप गर्दी असते.
मला नको शिकवू. मला माझी पर्स सांभाळता येते हो! चला, मी तुम्हाला आईस्क्रीम खाऊ घालते.


दादा, या सर्वांना एकेक आईस्क्रीम द्या. अरे... माझे पैसे कुठं गेले? कोणीतरी माझ्या पर्समधून पैसे काढून घेतले. अरे देवा! आता मी काय करु...?
मोंटू, तू बरोबरच सांगत होतास. मला माझ्या पर्सकडे लक्ष ठेवायला हवं होतं.
आता मला कळलं, की कोणाच्या गरिबीची चेष्टा करायची नाही. कदाचित त्यामुळेच मला ही शिक्षा मिळाली असावी, मी पुन्हा कधीच असं वागणार नाही.

# सिनेजगत चित्रपट पुरस्कार



## राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

चित्रपट क्षेत्रामध्ये दिले जाणारे राष्ट्रीय फिल्म पुरस्कार हे १० ऑक्टोबर १९५४ पासून अगोदरच्या वर्षात प्रदर्शित झालेल्या चित्रपटांना देण्यात येत आहेत. सुवर्ण कमळ आणि रजत कमळ असे दोन पुरस्कार सर्वांग सुंदर चित्रपटांना दिल्यानंतर,बाकीचे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, चित्रपटाच्या इतर कलात्मक आणि तांत्रिक अंगांसाठी दिले जातात. या पुरस्कारांची विभागणी ३ भागात करण्यात आली आहे.

अ) फिचर फिल्म     ब) गैर फिचर फिल्म

क) सिनेमावरील श्रेष्ठ लेखन

या पुरस्कारांचे उद्दिष्ट रुचीपूर्ण आणि तांत्रिक दृष्टीने उत्कृष्ट, तसेच सामाजिक आणि प्रासंगिक आशयपूर्ण चित्रपटांच्या निर्मितीस प्रोत्साहन देऊन, चित्रपटाच्या माध्यमातून देशातील भिन्न संस्कृतीची ओळख आणि त्याविषयी आदर निर्माण करुन राष्ट्रीय एकता आणि अखंडता दृढ करणे हा होय.






## दादासाहेब फाळके पुरस्कार

हा पुरस्कार भारत सरकारतर्फे दरवर्षी सिनेमामध्ये असामान्य कामगिरी करणाऱ्या कलावंत व तंत्रज्ञानांना दिला जाणारा सर्वोच्च सन्मान आहे. सन १९६९ मध्ये भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक ‘दादासाहेब फाळके’ यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून हा पुरस्कार दिला जात आहे. हा पुरस्कार भारत सरकारच्या माहिती व नभोवाणी खात्यातर्फे दिला जातो. दरवर्षी भरवल्या जाणाऱ्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्या दरम्यान या पुरस्काराचे वितरण केले जाते. १९६९ पासून दिल्या जात असणाऱ्या या पुरस्काराची रक्कम अनेक वेळा बदलण्यात आली आहे. सन २००६ पासून या पुरस्काराचे स्वरुप, सुवर्ण कमळ, शाल आणि दहा लाख रुपये रोख रक्कम असे आहे. अभिनेत्री ‘देविका राणी’ यांना सर्वप्रथम या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## फिल्मफेअर पुरस्कार

हा भारताच्या चित्रपटसृष्टीतील सर्वात जुना व मानाचा पुरस्कार सोहळा आहे. फिल्मफेअर पुरस्कारांचे वितरण दरवर्षी टाईम्स समूहातर्फे केले जाते. इ.स.१९५४ सालापासून चालू असलेले हे पुरस्कार राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसोबत बॉलिवूडमध्ये प्रतिष्ठेचे मानले जातात. द क्लेअर्स हे पुरस्कार सोहळ्याचे मूळ नाव, द टाईम्स ऑफ इंडियाच्या समीक्षक क्लेअर मेंडोसा यांच्या नावावरुन ठेवले होते. त्यानंतर पुरस्कारांचे नाव फिल्मफेअर या चित्रपटविषयाला वाहिलेल्या नियतकालिकाच्या नावावरुन 'फिल्मफेअर अवॉर्ड्स' असे झाले.

१९५६ सालापासून फिल्मफेअर पुरस्कार विजेत्यांची निवड ही समितीद्वारे व साधारण जनतेद्वारे केली जात आहे. १९५३ मध्ये फिल्मफेअर नियतकालिकाच्या वाचकांच्या मतदानाद्वारे (यात २०००० वाचकांनी भाग घेतला) पहिल्यांदा सर्वाधिक लोकप्रिय अभिनेता आणि अभिनेत्री यांची निवड केली गेली. २१ मार्च १९५४ रोजी झालेल्या पहिल्या फिल्मफेअर पुरस्कार समारोहात ५ पुरस्कार दिले गेले. त्यात 'दो बीघा जमीन' या चित्रपटास सर्वश्रेष्ठ चित्रपट, सर्वश्रेष्ठ निर्देशक करिता तसेच सर्वश्रेष्ठ अभिनेतासाठी दिलीप कुमार (दाग), सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीसाठी मीनाकुमारी (बैजू बावरा), तसेच याच चित्रपटासाठी सर्वश्रेष्ठ संगीतासाठी नौशाद यांना पुरस्कार सन्मानित करण्यात आले. ❖

- संकलन - निलेश माने (अंबरनाथ)

कुतुहल

## पंख आणि केस कापताना वेदना का होत नाहीत?

याचं उत्तर मिळवण्याआधी आपल्याला वेदना का होतात हे पाहिलं पाहिजे. शरीरातल्या जिवंत पेशींशी मज्जातंतू जोडलेले असतात. त्या पेशींची मोडतोड झाली, त्यांना इजा झाली, की या मज्जातंतूंची टोकं चाळवली जातात. त्यांच्यामधून विद्युत रासायनिक संदेश मेंदूपर्यंत पोचतो आणि वेदनेची जाणीव आपल्याला होते. जर हे मज्जातंतू चाळवलेच गेले नाहीत तर वेदना होणारच नाही. नखं आणि केस या मृतपेशी असतात. त्यामुळे त्यांच्याशी मज्जातंतू जोडलेले नसतात. साहजिकच नखे कापताना किंवा केस कापून घेताना वेदना जाणवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. परंतु नखांची किंवा केसांची वाढ ज्या फॉलिकल मधून होते त्या जिवंत पेशी असतात. केस कापण्याऐवजी ते उपटले तर या पेशींना धक्का पोचतो. त्यांच्याशी जोडलेल्या मज्जातंतूंना त्याचा प्रभाव जाणवतो व आपल्याला वेदना होतात.

दाढीच्या बाबतीतही हीच स्थिती असते. कितीही गुळगुळीत दाढी केली तरी ती करताना त्या केसांच्या फॉलिकलला धक्का पोचत नाही. पण इलेक्ट्रिक शेव्हरने दाढी करताना काही वेळा त्यात अडकलेला दाढीचा केस ओढला जातो, उपटला जातो आणि वेदना होतात. ❖

- संकलन - रुपाली शिंदे (अंबरनाथ)



# बुद्धांचा उपदेश

एकदा भगवान गौतम बुध्द आणि त्यांचे शिष्य एका गावाहून दुसऱ्या गावाला निघाले होते. गावाच्या वेशीवर त्यांना एक व्यक्ती भेटली. ती बुध्दांना बघून खूप अपशब्द बोलू लागली. भगवान बुध्द शांतपणे पुढे चालत राहिले. ते बघून ती व्यक्ती जास्तच चिडली आणि शिव्या सुध्दा देऊ लागली. भगवान बुध्द पुन्हा काही न बोलताच पुढे जाऊ लागले. सारे शिष्यही त्यांच्या पाठोपाठ चालत होते; पण बऱ्याच शिष्यांना त्या उर्मट बोलणाऱ्या व्यक्तीविषयी खूप राग येत होता. त्याला प्रतिउत्तर द्यावे असे त्यांना वाटत होते.

एका शिष्याने धाडस करुन भगवान बुध्दांना विचारले, “भगवन! त्या व्यक्तीने आपली काही चूक नसताना खूप अभद्र शब्द बोलून आपला अपमान केला, तरी तुम्ही त्या व्यक्तीला प्रतिउत्तर का दिले नाही? त्याच्यावर रागावला का नाहीत?”

बुध्द हसत हसतच म्हणाले, “तो समोर एक भिकारी बसलेला पाहिलाय? कित्येक दिवसांपासून त्याने आंघोळ देखील केलेली दिसत नाही. त्याचं कळकट, मळकट, फाटलेलं वस्त्र जर त्याने तुम्हाला परिधान करायला दिलं तर तुम्ही ते परिधान कराल का?”

शिष्य म्हणाले, “भगवन! ती कळकट, फाटलेली, मळलेली वस्त्रं कोण कसं वापरेल?”


“जर तुम्ही त्याची घाणेरडी वस्त्र परिधान करु शकणार नाहीत, तर मग त्या व्यक्तीने दिलेले घाणेरडे शब्द मी का स्वीकारावेत?”

तात्पर्य : कोणी जर आपल्याला विनाकारण अपशब्द बोलू लागला आणि आपणही रागावून त्याला प्रतिउत्तर देऊ लागलो तर याचा अर्थ, आपण आपली स्वच्छ वस्त्रं काढून त्याने दिलेली घाणेरडी वस्त्रं परिधान करण्यासारखं आहे. ❖

– संकलन – मनीषा साळुंखे (मीरा रोड)

कविता

# किसान दिन



सिंचून घामांच्या धारांनी
फुलवतो मळा, हिरवी शेती
बळीराजा जगाचा पोशिंदा
करी कष्टाने देशाची प्रगती

देशाच्या विकासासाठी
अमूल्य तयाचे योगदान
अविरत कार्य कर्तृत्वाला
चला देऊ या सारे मान.....



निसर्ग खुलला हिरवाईने
डोलती पिकं वाऱ्यावरी,
दिसे सृष्टी गोजिरवाणी
स्वर्ग अवतरला धरणीवरी

पिकांस मिळावा मोबदला
कष्टाला साजेसा अनुरुप
फुलवू या मुखावरी त्यांच्या
परिवारही राहावा सुखरुप



देशाचे पाचवे पंतप्रधान
चरणसिंगांचा हा जन्मदिन
कृषी क्षेत्राला देण्या आकार
करिती साजरा किसान दिन

हाक दिली गांधीजींनी
शेती वाचविण्यासाठी
खेड्याकडे चला सर्वांनी
उज्ज्वल भविष्यासाठी

- रघुनाथ भागवत (महाड)

# इस्रोचे अतुलनीय यश - चांद्रयान -१ व २ मोहीम

भारताने आपल्या चांद्रयान मोहिमेची सुरुवात २२ ऑक्टोबर २००८ रोजी चांद्रयान-१ चे यशस्वी प्रक्षेपण करुन केली होती. या मोहिमेमुळे भारताला एकमेव नैसर्गिक उपग्रह असलेल्या चंद्राची बरीच रहस्ये जाणून घेण्यात मदत झाली. चांद्रयान-१ च्या प्रक्षेपणानंतर अवघ्या आठ महिन्यात चांद्रयान-१ ने मोहिमेची सर्व उद्दिष्टे साध्य केली. आजही जगभरातील शास्त्रज्ञ या मोहिमेतून गोळा केलेल्या माहितीचा अभ्यास करत आहेत. या मोहिमेतील यशामुळे जगभरात भारताच्या अवकाश विज्ञानाची विश्वासार्हता वाढली.



चांद्रयान-२ ही इस्त्रोची दुसरी चंद्र मोहीम होती. हे यान २२ जुलै २०१९ रोजी प्रक्षेपित करण्यात आले होते. त्यात ऑर्बिटर, लँडर आणि रोव्हर यांचा समावेश होता. २० ऑगस्ट २०१९ रोजी ऑर्बिटर यशस्वीरित्या चंद्राच्या कक्षेत समाविष्ट करण्यात आले. विक्रम या लँडरने ७ सप्टेंबर २०१९ रोजी चंद्राच्या पृष्ठभागावर उतरण्याचा प्रयत्न केला; परंतु टचडाऊनच्या काही वेळापूर्वी त्याचा जमिनीवरील नियंत्रणाशी संपर्क तुटला. विक्रम लँडरचे अपयश चांद्रयान-२ मोहिमेसाठी एक धक्का होता; परंतु ऑर्बिटर आणि रोव्हर अजूनही कार्यरत आहेत आणि चंद्राविषयीची महत्त्वपूर्ण माहिती पुरवत आहेत. या मोहिमेच्या माध्यमातून, चंद्राच्या अभ्यासातून आपल्याला पृथ्वीच्या भूतकाळाविषयीही माहिती मिळाली. चंद्राच्या पृष्ठभागावर कोट्यावधी वर्षांमध्ये मोठे बदल झालेले नाहीत. त्यामुळे सूर्यमालेत सूर्याजवळच्या भागात गेल्या कोट्यावधी वर्षांमध्ये घडलेल्या अनेक घटनांचे पुरावे चंद्राच्या पृष्ठभागावर असतील अशी अपेक्षा होती. चंद्राची निर्मिती कशी झाली हे सांगणारे काही प्रचलित सिध्दांत असले तरी, चांद्रभूमीवरील विविध मूलद्रव्ये, खनिजे यांचे नेमके मापन करुनच त्याच्या निर्मितीचे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न या मोहिमेतून करण्यात आला.

चांद्रयान-१ या मोहिमेतून चंद्रावर पाण्याचे अंश असल्याचे पुरावे मिळाले होते. चंद्राच्या विविध भागांमध्ये, तसेच जमिनीच्या आणि मातीच्या विविध स्तरांमध्ये पाण्याचे वितरण कसे आहे याविषयी सखोल माहिती जमा करणे, चंद्रावरील पाण्याचा उगम शोधण्यासाठी तसेच अत्यंत विरळ असणाऱ्या वातावरणाचा अभ्यास करणे ही उद्दिष्टे चांद्रयान-२ ची होती. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर मोठ्या प्रमाणात पाण्याचे अस्तित्व असण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती त्याला या मोहिमेतून दुजोरा मिळाला.

अलीकडेच, नियोजित चांद्रयान-३ प्रक्षेपणापूर्वी, भारताने आर्टेमिस एकॉर्ड नावाच्या अमेरिकेच्या २०२५ मधील चांद्रमोहिमेच्या करारावर स्वाक्षरी केली. चंद्रावर शांततापूर्ण मानवी आणि रोबोटिक संशोधन करण्याच्या उद्देशाने नासाच्या नेतृत्वाखाली जगातील भारतासहित २७ देशांनी आर्टेमिस करारावर स्वाक्षरी केली आहे. अमेरिकेने आर्टेमिस एकॉर्ड मोहिमे अंतर्गत जगातील पहिली महिला २०२५ पर्यंत चंद्रावर पाठवण्याचे योजिले आहे. या मोहिमेच्या माध्यमातून भविष्यात मंगळ ग्रहावर मानव पाठवताना चंद्रावर आपले स्टेशन उभारण्याचा नासाचा मानस आहे. चंद्रावरुन मंगळ आणि त्यापलीकडील ग्रहांबाबत अधिकाधिक संशोधन करणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

इस्त्रोच्या चांद्रयान मोहिमेतून मिळविलेली माहिती भविष्यातील आर्टेमिस मोहिमेतील मानवी लँडिंगसाठी अत्यंत उपयुक्त ठरु शकणार आहे. ❖



# योग्य पर्याय निवडा

१) ६ डिसेंबर  हा दिवस म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची...... पुण्यतिथी / जयंती

२) मानवी हक्क दिवस - १९ डिसेंबर / १० डिसेंबर

३) जगातील सर्वात उंच शिखर - एव्हरेस्ट / कांचनगंगा

४) 'बीजगणित' हा ग्रंथ यांनी लिहिला - भास्कराचार्य / आर्यभट्ट

५) भारतातील पहिले महिला विद्यापीठ सुरु केले - महर्षी कर्वे / महात्मा फुले

६) येशू ख्रिस्त यांची शिकवण या ग्रंथात आहे - बायबल / कुराण

७) नवीन संसद भवनात कामकाज सुरु झाले - २८ मे २०२३ / १९ सप्टेंबर २०२३

८) भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक - व्ही. शांताराम / दादासाहेब फाळके

९) सर्वाधिक जंगल असलेले राज्य - मध्य प्रदेश / आसाम

१०) चंद्रावर सारख्याच उंचीवरुन एक हातोडा आणि मोरपीस खाली टाकले तर -

दोन्ही एकाच वेळी पडतील / हातोडा आधी पडेल

११) सर्वात हलका वायू - लिथियम / पोटॅशियम

१२) संत गाडगेबाबा यांचे नाव- श्याम / डेबू

१३) बावन्न दरवाजांचे शहर - संभाजी नगर / अहमदनगर


१४) २ सप्टेंबर २०२३ रोजी प्रक्षेपित केलेलं आदित्य एल-१ हे यान हे चार महिन्यांनी इथे पोचणार आहे. -

सूर्याच्या कक्षेत / मंगळाच्या कक्षेत

१५) सतयुगातील बळी राजा भक्त प्रल्हादाचा - पुत्र होता / नातू होता

उत्तरे इतरत्र

# आनंदवनाचा यात्री



दीन-दुबळ्या लोकांच्या जीवनात आनंदाचा, सौख्याचा प्रकाश निर्माण करणारे बाबा आमटे हेएक महान समाजसेवक होते, त्यांनी आपलं संपूर्ण जीवन समाजाचं दु:ख आणि दारिद्र्य दूर करण्यासाठी खर्च केलं.

बाबांचा जन्म वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे २६ डिसेंबर १९१४ रोजी झाला.

त्यांचे शिक्षण नागपूर येथे झाले. पुढे समाजातील उपेक्षित असंघटित लोकांसाठी त्यांनी काम करायला सुरुवात केली. स्वातंत्र्य-चळवळीत भाग घेऊन त्यांनी तुरुंगवासही भोगला. दलित बांधवांना ते त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देऊ लागले.

लोकसेवेचे काम करता-करता ते साफ-सफाईचे, शौचालय साफ करण्याचेही काम करीत. एकदा त्यांना नाक, कान झाकून गेलेला, जखमांनी विव्हळणारा, गटाराच्या कडेला पडलेला एक महारोगी दृष्टीस पडला. तो असहाय्य जीव पाहून बाबांचं मन गलबललं. त्यांच्या मनातील करुणा जागृत झाली; अन महारोग्यांच्या सेवेसाठी आयुष्य पणाला लावण्याचं ठरवून जनसेवेचं व्रत स्वीकारलं.

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड, हेमलकसा येथे त्यांनी कुष्ठरोग्यांसाठी श्रमदानाने आश्रम उभारले. उपेक्षेचे, अपमानाचे चटके सोसत समाजाने दूर लोटलेले असंख्य कुष्ठरोगी बाबांच्या आश्रमात आश्रयाला आले. कुष्ठरोग्यांची शुश्रूषा करुन त्यांची सेवा करु लागले.

कुष्ठरोग्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. डोंगराळ भागातील जमीन साफ केली. पाण्यासाठी श्रमदानाने विहिरी खोदल्या. निवाऱ्यासाठी पक्क्या झोपड्या उभ्या केल्या. बाबांनी माळरानावर शेती फुलवली. औषधोपचाराने, मायेने बरे वाटू लागलेले कुष्ठरोगी या शेतात बाबांना मदत करु लागले.हळूहळू बाबांनी त्यांना सुतारकाम, लोहारकाम, पत्र्यापासून डबे, संसारोपयोगी वस्तू बनविणे, चटया विणणे, भाजीपाला, फळे विक्रीस पाठवणे, असे विविध व्यवसाय शिकवून स्वावलंबी बनवले. रोग-मुक्त झालेल्या कुष्ठरोग्यांच्या वसाहती बाबांनी स्थापन केल्या. त्या वसाहतीला त्यांनी नाव दिले 'आनंदवन.'

कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी दवाखाना सुरु करुन त्यांच्या औषधोपचाराची व्यवस्था केली; त्यांना आरोग्याचे, स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

बाबांनी समाजसेवेचे वेगळे, अनोखे अनेक प्रयोग करुन त्यात यश मिळविले. त्यांनी कुष्ठपीडितांच्या आणि इतरही मुलां-मुलीसाठी शाळा आणि महाविद्यालये उघडली. अनाथ मुले, अपंग, वृध्द यांच्या सेवेसाठी अनाथाश्रम, वृध्दाश्रम उघडले. जंगलातील जखमी, अपंग प्राणी आणि पक्ष्यांसाठी औषधोपचाराची, पालन-पोषणाची व्यवस्था केली.

देशाची एकता आणि अखंडता धोक्यात आलेली पाहून बाबांनी भारत जोडो अभियान सुरु केले. भारतभर पदयात्रा काढून त्यांनी सर्वांना भारताच्या एकतेचे, अखंडत्वाचे रक्षण करण्यासाठी शिकवण दिली.

मानवतेची अखंड सेवा करता-करताच हे महान योगी अनंतात विलीन झाले. त्यांच्या मागे त्यांचे सुपुत्र डॉ. प्रकाश आमटे व त्यांच्या सुनबाई मंदाताई आमटे आश्रमाची जबाबदारी पार पाडत आहेत. ❖



दिन विशेष

# नाताळ

नाताळ किंवा ख्रिसमस हा एक ख्रिश्चन धर्मीय बांधवांचा सण असून तो दरवर्षी २५ डिसेंबर या दिवशी येशू ख्रिस्त यांचा जन्मदिन म्हणून जगभर साजरा केला जातो.

या दिवशी ख्रिश्चन अनुयायी एकमेकांना विविध भेटवस्तू व नाताळ शुभेच्छापत्र देऊन अभिनंदन करतात. घरात रोषणाई केली जाते. ख्रिसमस ट्री म्हणजे सूचिपर्णी वृक्ष सजवला जातो. याच दिवशी रात्री सांताक्लॉज हा एक देवदूत लहान मुलांसाठी भेटवस्तू वाटतो असे मानले जाते.

येशू ख्रिस्त यांचा जन्म इस्त्राईल देशात बेथलहेम या गावी माता मारिया आणि पिता जोसेफ यांच्या घरी झाला. श्रीकृष्णाच्या जन्माच्या वेळी जसे दुष्ट कंसाने त्यांना मारायचे फर्मान सोडले होते, तसेच येशूंच्या जन्माची बातमी कळताच त्यावेळचा दुष्ट राजा हेरॉडने लहान मुलांना ठार मारण्याचा आदेश दिला. यामुळे येशूचे कुटुंबीय जीव वाचविण्यासाठी इजिप्तला गेले.


भगवान येशूंनी प्रेम, नम्रता, बंधुभाव तसेच सहनशीलतेची शिकवण दिली, त्यांनी क्षमाशीलता कधीही सोडली नाही. ते म्हणतात, प्रार्थना करताना प्रार्थनेमध्ये केवळ देवाच्या कृपेची गरज आहे हे मान्य करावे. आपल्या अपराधाबद्दल पश्चाताप हेच प्रायश्चित आहे.

त्या काळात त्यांचा विरोध करणारेही खूप होते. त्यांनी येशूंना सुळावर चढवले. काटेरी मुकुट घातला. हातापायाला खिळे ठोकले. तीन दिवस तसेच लटकवून ठेवले. एवढ्या वेदना होत असतानाही त्यांनी सहनशीलता सोडली नाही. केवळ देवाकडे हीच प्रार्थना केली, की हे लोक अज्ञानी आहेत. देवा, यांना क्षमा कर.

सहनशीलता, बंधुभाव, प्रेम, दया करुणेची मूर्ती भगवान येशूंच्या जन्मदिनानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

मेरी ख्रिसमस! ❖

# रंग भरा





## सामान्यज्ञान उत्तरे

१) पुण्यतिथी
२) १० डिसेंबर
३) एव्हरेस्ट
४) भास्कराचार्य
५) महर्षी कर्वे
६) बायबल
७) १९ सप्टेंबर २०२३
८) दादासाहेब फाळके
९) मध्यप्रदेश
१०) दोन्ही एकाच वेळी पडतील
११) लिथियम
१२) डेबू
१३) संभाजी नगर
१४) सूर्याच्या कक्षेत
१५) नातू

## शब्दकोडे

### २२५ चे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ सु | नी | २ ता | | ३ क | ल | ४ वा |
| ग्री | | श्कं | | ल्प | | र |
| ५ व | ६ र | द | वि | ना | य | क |
| | ज | | | चा | | री |
| ७ भा | त | | ८ मा | व | सा | |
| ऊ | | ९ खो | क | ला | | १० बि |
| ११ बी | १२ ट | | ड | | १३ द | हा |
| १४ ज | न | क | | १५ डॉ | ल | र |



।। तू ही निरंकार ।।
पूर्ण सद्गुरु निजभक्तांची सारी संकटे दूर करी ।
पूर्ण सद्गुरु निजभक्तांवर कृपा दृष्टी उपकार करी ।
पूर्ण सद्गुरु भक्त जनांची पापे सारी नष्ट करी ।
पूर्ण सद्गुरु निजभक्तांची सर्व सुखाने झोळी भरी ।
पूर्ण सद्गुरु निजभक्तांवर आले संकट दूर करी ।
पूर्ण सद्गुरु भक्त जनांचे दुःख तापही दूर करी ।
महालक्ष्मी
सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...
लग्न बस्त्याची खास सोय !
शंकरराव जाधव
संयोजक, वाई तालुका
अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन
THE COMPLETE FAMILY SHOWROOM
मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते
ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा । घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा ।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है । ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है ।
गुरू का जो यशगान करेगा यश दुनिया में पायेगा। उसकी भी महिमा होगी जो गुरू की महिमा गायेगा।
गुरू की जै जै जो करता है उसकी होती जै जै कार। गुरू की पूजा जो करता है उसको पूजे कुल संसार।
९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2022-2024
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2022-24
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

